# प्रकरण 2

# उत्तर चालुक्यकाल

मागील संशोधन प्रकरणात आपण प्रस्तुत संशोधन कार्याची व्याप्ती, मर्यादा व महत्व जाणुन घेतलेले आहे. आता आपण उत्तर चालुक्य कालखंडातील राजकीय, सामाजिक व अर्थिक परिस्थिती कशी होती. तसेच याचा धर्मसंस्थेवर कसा प्रभाव पडला हे जाणुन घेवु.

## I उत्तर चालुक्यकालीन राजकीय परिस्थिती

मौर्य कालखंडानंतर भारताच्या इतिहासात सर्वाधिक प्रसिद्ध असलेले घराणे म्हणजे गुप्त घराणे. गुप्तांच्या काळात कलेच्या क्षेत्रात खुप प्रगती झाली. पुढे गुप्तांच्या ऱ्हासानंतर उत्तरेत वर्धन घराण्याची सत्ता निर्माण झाली. या वंशातील पराक्रमी राजा हर्षवर्धन हा होय. हर्षवर्धनने आपल्या दरबारात अनेक साहित्यिक कलाकार यांना राजाश्रय दिला. याच काळात महायान पंथाचा प्रसार झाला. याच काळात भारताचे पूर्व व आग्नेय आशियाशी संबंध निर्माण झाले. इ.स. च्या 7 व्या शतकाच्या शेवटी वर्धन घराण्याच्या अस्तानंतर भारतात छोटया–छोटया प्रादेशिक राज्यांची निर्मिती झाली. याच काळात दक्षिणेत अनेक प्रमुख प्रांतीय सत्तांची, निर्मिती झाली. ज्यात बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट, कल्याणीचे चालुक्य, होयसळ, कदंब, शिलाहार, गंग, पल्लव, चोल, यादव व काकतीय या सारख्या प्रादेशिक सत्तांचा उल्लेख करता येईल.

## चालुक्यांचा राजकिय इतिहास

भारताच्या इतिहासात चालुक्यांच्या प्रामुख्याने चार शाखा निर्माण झाल्या. त्यापैकी एक शाखा 'अन्हिलवाड किंवा गुजरातचे चालुक्य' या नावाने ओळखले जाते. ही उत्तर भारतातील एकमेव चालुक्य सत्ता दक्षिण भारतात मात्र विविध कालखंडात चालुक्यांच्या तीन स्वतंत्र शाखा निर्माण झाल्या. यांना 'दक्षिणी चालुक्य' असे म्हणतात.

1. बदामीचे किंवा वातापीचे चालुक्य (इ.स. 535 – इ.स. 752)
2. कल्याणीचे चालुक्य आणि (इ.स. 973 – इ.स. 1181)
3. वेंगीचे चालुक्य. (इ.स. 621 – इ.स. 1120)

## चालुक्यांची उत्पत्ती

भारतीय इतिहासातील अनेक घटनांबाबत इतिहासकारांध्ये तीव्र मतभेद आढळतात. चालुक्य वंशाबद्धल व उत्पत्तीबद्धलही मतभेद आढळतात असे मतभेद आढळणे साहजिकच आहे कारण तत्त्कालीन साधनांची कमतरता, उपलब्ध असलेली साधने अर्धवट व अपूरी माहिती देतात. शिवाय धार्मिक कार्यकारणभाव या गोष्टीमुळे असे मतभेद जाणवतात. बिल्हंणाने आपल्या 'विक्रमांकदेवचरित' या ग्रंथात चालुक्यांच्या उदयासंबंधी एक कथा सांगितलेली आहे. ब्रह्मदेवाची प्रातःसंध्या चालली होती. त्याने सूर्याला अर्ध्य देण्यासाठी ओंजळीत पाणी घेतले होते. त्याच वेळी इंद्र तिथे आला. त्याने विधात्याला (ब्रह्मदेव) गऱ्हाणे सांगितले की, सध्या सर्व जग पापमय बनले आहे. कोणी यज्ञयोग करीत नाही, की देवांना हविर्भाव देत नाही. त्यामुळे स्वर्गातले देवराज्य हादरले आहे. ते ऐकून ब्रह्मदेवाला खेद वाटले. त्यांने ओंजळीतल्या चुलूकाकडे म्हणजे चुळकावर पाण्याकडे निराळया अभिप्राय पाहिले आणि तत्क्षणीच त्यांतून एक धीर, वीर पुरूष निर्माण झाला. चुलूकांकडून निघाला म्हणून तो 'चालुक्य' ठरला. तोच त्या वंशाचा मूळ पुरुष झाला. त्याने अयोध्येत आपले राज्य स्थापले. कालांतराने त्या घराण्याची एक शाखा दक्षिणेत आली आणि तिने कर्नाटक व कोकण यांवर आपली सत्ता स्थापून नांवलौकिक मिळविला.[1]

1. डॉ.स्मिथ यांच्या मते चालुक्य 'चंप' नामक जातीशी संबंधित आहे. 'चपं' ही परदेशी समजल्या जाणाऱ्या गुर्जरांची एक शाखा आहे. म्हणजेच यावरून 'चालुक्य' हे परदेशी असल्याचे डॉ. स्मिथ सूचवितात.
2. काही विद्वान चालुक्यांना 'शुलिक' म्हणतात, या शुलिकांचा उल्लेख बृहत्संहितेत[2] आलेला आहे.
3. आणखी एका मतानुसार चालुक्य भारतीय उपखंडातील चुलिक (साण्डिअन) नांवाच्या प्रदेशातील असावेत. ज्यामुळे चालुक्य असे नामकरण नंतरच्या कालखंडात झाले असावे.

---

1. जोशी महादेव शास्त्री, भारतीय परिचय पुस्तक मालाः 3, 'कर्नाटक' प्रथमावृत्ती, ज्ञानराज प्रकाशन, पुणे, 1961, पृ.क्र. 18.
2. शास्त्री अजय मिश्र यांच्या मते ब्रहत्संहितीचा कालखंड 6 व्या शतकातील असावा. या ग्रंथाचा निर्माता वराहमिहीर असूनब्रहत्संहितीचा शब्दशः अर्थ विखूरलेल्या गोष्टिंचे (कला, ज्ञान) ब्रहत संकल न असा होतो यात ज्योतिष्यात शास्त्र, कला, स्थापत्य व्यवहार उपदेश इ. माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

4. डॉ.डी.सी. सरकार चालुक्यांना कन्नड जातीचे मानतात नंतर ते स्वतःला क्षत्रिय समजू लागले.
5. 'पृथ्वीराजरासो' ग्रंथात चालुक्यांची उत्पत्ती माउंट अबू पर्वतावर वसिष्ठ मुनी यांच्या वतीने केले गेलेल्या यज्ञ प्रसंगी यज्ञकुंडातून झाल्याचे सांगितले आहे. या वरून चालुक्य हे अग्निकुळातले क्षत्रिय होते असा मतप्रवाह दिसून येते.
6. बिल्हणच्या 'विक्रमांकदेवचरिंत' ग्रंथात चालुक्यांची उत्पत्ती ब्रह्माच्या ओजंळीतून (चुलूक) झाल्याचे सांगितले आहे. चुलूक या शब्दाचे अपभ्रंश होऊन 'चालुक्य' असा शब्दप्रयोग नंतर झाला असावा.
7. चालुक्यांच्या बहुतेक शिलालेखांमध्ये चालुक्य राजे स्वतःला चंद्रवंशीय क्षत्रिय समजतात. या कोटी व लेखानुसार चालुक्यांचा वंशवृक्ष पुढील प्रमाणे तयार होतो. ब्रह्म, स्वंयभु, मनु, मानव्य, हरित, पंचशिव्य, हरिति आणि चालुक्य.

पण डॉ.डी.सी.सरकारांच्या मते हे वंश वृक्ष पौराणिक आणि काल्पनिक आहे. चालुक्यांची ब्रह्मद्वारे उत्पत्ती ही धारणा काल्पनिक मानता येईल पण प्राचीन शिलालेख व ताम्रपटांच्या आधारे त्यांना चंद्रवंशीय क्षत्रिय समजणे काल्पनिक होणार नाही. [3] बसवकल्याण येथील पीरपाशा दर्गाच्या दक्षिण भागातील कल्याणी चालुक्य राजा जयसिंहाच्या इ.स. 1025 च्या शिलालेखानुसार चालुक्य वंशाचे वंशावळ दिसते.[4]

## कल्याणीचे चालुक्य

दक्षिण भारतात राष्ट्रकुट सत्तेच्या अस्तानंतर चालुक्यांची सत्ता निर्माण झाली. राष्ट्रकुटांच्या नंतर एक पराक्रमी वंश म्हणून दक्षिण भारतात कल्याणीच्या चालुक्याकडे पहिले जाते. जवळ जवळ 200 वर्ष कल्याणीच्या चालुक्यांनी सत्तेचा उपभोग घेतला. राष्ट्रकुटांचा शेवटचा राजा कर्क द्वितीयचा पराभव करून तैलपने सत्ता हस्तगत केली.[5] आणि चालुक्य वंशाच्या सत्तेस पुन्हा प्रांरभ झाला. बदामीच्या चालुक्य घराण्याला

---

3. पांण्डेय विमल चंद्र, प्राचीन भारत का इतिहास (इ.स.250 ते इ.स.1200), प्रथमावृत्ती, एस.चंन्द ॲण्ड कंपनी लि., नई दिल्ली, 2003, पृ.क्र. 383.
4. Kannada University Epigraphical Series – VIII, Bidar District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 2006, Page No.49.
5. पांण्डेय विमल चंद्र, उपरोक्त, पृ.क्र. 388.

पूर्वकालीन चालुक्य असे म्हणतात, तर तैलपाने इ.स. 973 साली सुरू केलेल्या चालुक्य राजवटीला कल्याणीचे चालुक्य किंवा उत्तरकालीन चालुक्य असे म्हणतात. या दोन्हीमध्ये साधारणतः 216 वर्षाचे अंतर आहे. जेंव्हा बदामीच्या चालुक्यांचा अंत झाला तेंव्हा भारतातील वेगवेगळया परिसरात लहान मोठया चालुक्य सत्ता संस्थानिकाच्या स्वरूपात का होईना अस्तित्त्वात होत्या. अशाच एखाद्या दूरच्या शाखेपैकीच तैलप ही पराक्रमी व्यक्ती असावी, संधी मिळताच त्याने राष्ट्रकुट सत्तेचा नाश करून दक्षिणेत पुन्हा चालुक्य वंशाला ते राजवंशाचा दर्जा प्राप्त करून दिला. तोच हया कल्याणीच्या चालुक्य सत्तेचा संस्थापक होय.

बदामीचे, वातापीचे चालुक्य आणि कल्याणीचे चालुक्य यांच्यात नेमके नाते काय आहे? राष्ट्रकुटांच्या राजवटीत तैलपाचे पूर्वज कोठे होते? काय करीत होते? या सर्व प्रश्नाचे साधनांच्या अभावी समाधानकारक उत्तर देता येत नाही. कारण बदामीचे चालुक्य मानव्य गोत्री व हारीती नामक पुरूषाला (ब्रह्म?) मूळ पुरूष मानणारे होते. तर कल्याणीचे चालुक्य सत्याश्रयाला आपला मूळ पुरूष मानतात. बदामीच्या चालुक्यांचे बिरूद आणि कल्याणीच्या चालुक्यांची बिरूदं यांच्यात कोठेही समानता दिसून येत नाही. बदामीचे चालुक्य परमेश्वर, सत्याश्रय, महाराजधिराज, रणरसिक, व पृथ्वीवल्लभ अशी बिरूदं धारण करीत, तर कल्याणीचे चालुक्य जगदेवमल्ल, त्रिभुवनमल्ल, त्रैलोक्यमल्ल, भूलोक्यमल्ल आणि भवनैकमल्ल अशी बिरूद किंवा सन्माननीय पदव्या आपल्या नांवासमोर लावत असत. यावरून त्यांच्यातील तुटकपणा म्हणजे अशा दोन सत्तांचा एकमेकांशी कसलाही संबंध नसल्याचे दर्शवितात. तर मिरज येथे एक ताम्रपट सापडलेला आहे. त्यात बदामीच्या चालुक्य राजवंशाचा व कल्याणीच्या चालुक्य राजवंशाचा संस्थापक तैलप याचा कसा संबंध होता, हे दर्शविले आहे.

कल्याणीच्या चालुक्यांच्या कालखंडा समांतर काही राजवटी दक्षिण भारतात अस्तित्त्वात होत्या त्या पुढील प्रमाणे. मालखेडचे राष्ट्रकुट, पश्चिमेकडील गंग, सौदंतीचे आणि बेळगावचे रट्‌ट, गोव्याचे कदंब, दक्षिण कोकण कोल्हापूरचे शिलाहार, सेऊणदेशाचे

यादव, वेंगीचे चालुक्य, अनमकोंडाचे काकतीय, कांचीचे पल्लव, गंग, पांडय आणि कलचुरी.[6] या राजवटीचा व कल्याणीच्या चालुक्यांशी सतत राजकीय संबंध येत असत.

## तैलप दुसरा (इ.स. 973–997 इ.स.)

तैलप द्वितीयच्या अगोदर चालुक्य वंशात तैलप प्रथम होऊन गेला. तो राष्ट्रकुटांच्या वर्चस्वाखाली राज्य करीत होता. त्यांच्या नंतर तैलप द्वितीय इ.स.970 च्या सुमारास स्वतंत्ररित्या चालुक्यांचा राज्यकारभार करण्यास प्रांरभ केला. मिरजच्या ताम्रपटान्वये तैलप हा विक्रमादित्य व चेदी वंशाचा कलचुरीराजा लक्ष्मणराज याची राजकन्या बोंथादेवी या दांपत्याचा पुत्र होय. विक्रमादित्य व त्याचे पूर्वज राष्ट्रकुटांच्या राजवटीत सरंजामदार म्हणून कार्यरत असावेत. त्याच पध्दतीनुसार तैलप हा सुध्दा राष्ट्रकुटांचा सरंजामदार होता. त्याच्याकडे राष्ट्रकुट नरेश तिसऱ्या कृष्णाने विजापूरची सरंजामदारी सोपविलेली होती. सम्राट होण्यापूर्वीच त्याचा एक ताम्रपट सापडला आहे. त्यात तो स्वतःला महासामंताधिपती म्हणवून घेतो. कृष्ण तिसऱ्याच्या मृत्यूनंतर राष्ट्रकुटांचे स्वतंत्र साम्राज्य अस्थिर बनले. अनेक मांडलिक व सरंजामदार स्वतंत्र बनले. राष्ट्रकुटांचा एक मांडलीक राजा परमार (सीयक श्रीहर्ष) याने खोट्टीगच्या काळात राष्ट्रकुट राजधानी मालखेडवर आक्रमण करून मोठी धुळधाण केली. त्यामुळे राष्ट्रकुटांची प्रतिष्ठा धुळीला मिळाली. त्याचे मांडलिकांवरचे वर्चस्व कमी झाले. सर्वत्र बंडाळी निर्माण झाली. त्याच अस्थिरतेचा फायदा विजापूरचा सरंजामदार असलेल्या तैलपाने घेवून खोट्टिकाचा वारसदार दुसरा कर्क यांच्यावर हल्ला चढविला. त्यात तैलपाने दुसऱ्या कर्कची हत्या करून राष्ट्रकुट घराणे नामशेष केले व त्याच ठिकाणी स्वतःची राजवट सुरू केली. अशा प्रकारे इ.स.973 सालापासून मालखेड किंवा मान्यखेड याच ठिकाणी चालुक्य वंशाच्या सत्तेला प्रारंभ झाला. मालखेड येथे चालुक्यांनी राजवट तैलपाने सुरू केल्यानंतर हळू–हळू इतर मांडलिक राजांवर आपले प्रभुत्त्व निर्माण केले. तैलपाची विजयी घौडदौड थांबविण्यासाठी गंगराज पांचालदेव यांने तैलपावर आक्रमण केले. गंगराज पांचलदेव आणि तैलप यांच्यातील युद्दात

---

6. Murari Krishana, The Chalukyas of Kalyani (973 A.D. to 1200 A.D.), First Edition, Concept Publishing Company, Delhi – 1977, Page No. 3.

तैलप विजयी ठरला. कोकणातील शिलाहार व सेऊणदेशचे यादव यांनी तैलपाचे मांडलिकत्त्व स्वीकारले.[7] पुढे तैलपाने माळव्यातील भोजवंशीय राजा मुंजाचा पराभव झाला.[8] तैलपाचा मृत्यू इ.सनाच्या 997 सुमारास झाला.

## सत्याश्रय (इ.स.997 – 1008इ.स.)

तैलपाच्या मृत्यूनंतर मुलगा सत्याश्रय गादीवर आला. पित्याच्या आक्रमक धोरणामुळे परमार व चोल या दोन राज्यांशी त्याला संघर्ष करावा लागला. त्याने चोलांशी युध्द करून त्यांची संपत्ती लुटली. परंतू उत्तरेतील परमारांनी मात्र त्यांच्या राज्यातील कांही प्रदेश जिंकून घेतला.[9]

## विक्रमादित्य पांचवा (इ.स. 1008 – 1014 इ.स.)

हा सत्याश्रयाचा लहान भाऊ व दशवर्मनचा मुलगा होता. सत्याश्रयाच्या मृत्यूनंतर विक्रमादित्य चालुक्यांचा राजा बनला. याच्या कारकिर्दीतील प्रमुख युध्द म्हणजे दक्षिण कोसल राज्यावर प्राप्त केलेला विजय. यावेळी दक्षिण कोसलचा राजा भीमरथ महाभवगुप्त दुसरा हा राज्य करीत होता. शिलालेखांवरून स्पष्ट होते की, चालुक्य राजा विक्रमादित्य पाचवाचा सेनापती केसवजियाने कोसल युध्द जिंकले. विक्रमादित्याची अक्कादेवी नावांची एक बहिण होती तिच्यातील अंगभूत राजकीय गुणांमुळे तिला किसुकाड प्रांताची मराठी राजकर्ती बनविण्यात आले. विक्रमादित्याने 'त्रिभुवनमल्ल' आणि 'वल्लभ नरेंद्र' अशा पदव्या धारण केल्या.[10]

## जयसिंह द्वितीय (इ.स. 1015 ते 1043 इ.स.)

विक्रमादित्य पाचव्या नंतर त्याचा लहान भाऊ अय्यण द्वितीय याने जवळपास एक वर्षापर्यंत राज्यकारभर चालवला. त्याच्या नंतर त्यांचा सर्वात लहान भाऊ जयसिंह इ.स. 1015 च्या सुमारास राजगादीवर आला. त्याने 'त्रिभुवन मल्ल' 'जयदेवमल्ल', 'वल्लभ', 'नरेंद्रदेव' या पद्व्या धारण केल्या. तैलपाने परमार राजा मुंज यावा पराभव करून त्याला

---

7. सेऊणदेशचे यादव, कोल्हापूरचे व कोकणचे शिलहार, गोव्याचे कदंब, यांनी सुरूवातीस राष्ट्रकुटांचे मांडलिकत्त्व स्विकारले होते.
8. Yazadani G. (By Dr.A.S.Altekar) The Early History of the Deccan, Part – V, I, II, Oxford University Press, London, 1960, Page No. 320.
9. विश्वरूपे अ.वि., प्राचीन भारत, प्रथम आवृत्ती, पडगिलवार प्रकाशन, नागपूर, 1972, पृ.क्र. 227.
10. पांडे विमलचंद्र, प्राचीन भारत का इतिहास, (ई.स.250 से 1200 ई.स), प्रथमा आवृत्ती, एस.चंद्र ॲन्ड कंपनी लिमिटेड, नई दिल्ली, 2003, पृ.क्र. 389.

ठार मारले होते. या पराभवाचा बदला घेण्यासाठी त्याचा पुतण्या परमार राजा भोज संधीची वाट पहात होता त्याने कलचुरींचा राजा गांगेय व चोल राजा राजेंद्र यांच्या सहकार्याने चालुक्यांच्या विरोधात युद्ध पुकारले. पण जयसिंहाने त्या त्रिकुटांचा पराभव केला. इ.स. 1019 पुढे जयसिंहाने चेर व शिलाहारांचा पराभव करून राज्यविस्तार घडवून आणला. अशा प्रकारे जयसिहांने चालुक्यांची राज्यविस्ताराची परंपरापुढे कायम ठेवली.[11] याची बहिण अक्कादेवी ही सुद्धा वीरप्रशासक होती. ती किसूकाळ प्रांताची प्रशासक होती. तीनेही अनेक युद्धात सहभाग घेतल्याचा उल्लेख बागलकोट जिल्हयातील बेलूर शिलालेखात आलेला आहे.[12]

## सोमेश्वर पहिला (इ.स. 1043 ते 1068 इ.स.)

कल्याणीच्या चालुक्य राजवंशात पराक्रमी व राज्यविस्तारक म्हणून सोमेश्वर पहिल्याकडे पाहिले जाते. सोमेश्वरांच्या काळात परमार राजा भोजवर वेंगीच्या चालुक्यांनी आणि कलचुरीनी आक्रमण केले. परमार हे चालुक्यांचे शत्रू असतांनाही परमारांच्या साहयासाठी सत्याश्रयाने मुलगा विक्रमादित्य सहावा याला पाठविले व परमारांना विजय मिळवून दिला. भोज राजाचा वारसा जयसिंहास माळव्याचा राजा बनविले. सत्याश्रयाने माळव्यात वेंगीचा व कलचुरींचा मुलाकडून पराभव केल्यानंतर केरळ, कलिंगवर ताबा मिळविला.

सोमेश्वर प्रथम राजगादीवर येताच चोलांशी असलेला परंपरागत संघर्ष कायम ठेवला. हा संघर्ष चालू असतानाच इ.स. 1046 च्या सुमारास कोकणचा प्रदेश आपल्या ताब्यात आणला. चोल आणि कल्याणीचे चालुक्य यांच्यातील संघर्षाचे कारण वेंगीची गादी होती. वेंगीच्या गादीवर उत्तराधिकारी पदासाठी चाललेल्या संघर्षात एकाचा पक्ष चोल राजा राजेंद्र तर, एकाचा पक्ष सोमेश्वराने घेतला.[13] सोमेश्वर प्रथम याने वेंगीत सैन्य पाठवताच

---

11. भावे वासुदेव कृष्ण , महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास, 'मुसलमान पूर्व महाराष्ट्र', खंड पहिला, राजकीय इतिहास, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. 64.
12. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.158 – 159.
13. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Kannada Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2001, Page No.107.

चोल राजा राजेंद्रने वेंगीत राजधिराजला पाठविले. चोल राजपुत्राने सोमेश्वराचा पराभव केला. व सोमेश्वराचे राज्यही मिळविले. चोलांचा विजय अल्पकाळ राहिला. सोमेश्वराने परत राज्य जिंकून घेतले व चोलांची राजधारींनी कांची जिंकली पण राजेंद्र चोलाने सोमेश्वरांचा पराभव अखेरीला केला. इ.स. 1063 साली चोल राजाने सोमेश्वर प्रथमचा पराभव केला. उत्तर भारतात सोमेश्वर प्रथम ने परमार राजा जयसिंहाला मदत केली होती. त्यामुळे परमार राजा चालुक्यांचा मित्र होता. पण दक्षिणेत चोल मात्र कट्टर शत्रू होते. दक्षिण भारतात सोमेश्वराने चोलांविरूध्द संघर्ष केल्यानंतर केरळ, व पांडय राज्य पराभूत करून त्याच्या मदतीने मुलगा विक्रमादित्य सहाव्याच्या मदतीने श्रीलंकेवर विजय मिळविला. तैलपाने राष्ट्रकुट सत्तेचा पराभव करून चालुक्य सत्ता स्थापन केली. इ.स. 973 राष्ट्रकुटांची राजधानी मान्यखेंटहूनच चालुक्यांनी इ.स. 973 पासून राज्यकारभार केला. सोमेश्वर प्रथम त्याने संरक्षणाच्या दृष्टिकोनातून राजधानी मान्यखेंटहून कल्याण येथे आणली. कल्याण हे बदामी व मान्यखेटच्या मध्यभागी आहे. कल्याण राजधानीवरूनच कल्याणीचे चालुक्य असे नावे पडले. कल्याणीला सुरक्षित आणि वैभव संपन्नता सोमेश्वर प्रथमने प्रदान केली. सोमेश्वर प्रथमनेच उत्तर भारतातील माळवा, मगध, गुर्जर व कन्नौज पर्यंत राज्यविस्तार केला. [14] परमारांशी मैत्री करून कलचूरी आणि वेंगीचा पराभव सत्याश्रयाने केला. पूर्व आणि पश्चिम भागात विजय मिळविले. चोलांशी संघर्ष देवून व पराभव होवूनही चोलांवर विजय संपादन केले. पांडय आणि केरळ मिळून सागरापर्यंत सोमेश्वराने सत्ता निर्माण केली. [15] उतारवयात असाध्य आजाराला कंटाळून सोमेश्वरने तुंगभद्रा नदीत मार्च 1068 साली जलसमाधी घेतली.

## सोमेश्वर द्वितीय (इ.स. 1068 ते 1076 इ.स.)

सोमेश्वर प्रथमचा जेष्ठ पुत्र सोमेश्वर द्वितीय भूलोकमल्ल चालुक्यांच्या गादीवर इ. स.1068 साली बसला. तो धार्मिक वृत्तीचा होता. याने विविध मंदिरांना दान दिल्याचे

---

14. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.437.)
15. Yazadani G. (By Dr.A.S.Altekar) The Early History of the Deccan, Part – V, I, II, Oxford University Press, London, 1960, Page No. 349.

उल्लेख आढळतात.[16] त्याच्या पत्नीचे नाव लीळादेवी होते. ती धार्मिक वृत्तीची होती. हिने शिरूर (जिल्हा बागलकोट) येथील मल्लिकार्जुन मंदिराचा जीर्णोद्धार इ.स. 1049 साली केला.[17] सोमेश्वर प्रथमचा लहान मुलगा विक्रमादित्य याने सुरूवातीस भावाला विरोध न करता सहकार्य केले. विक्रमांकदेव चरित्रानुसार सोमेश्वर दुसरा अत्याचारी व अविश्वासी होता. यामुळे प्रजा त्याच्यावर रूसली होती अणि त्याच्या लहान भाऊ विक्रमादित्य हा राजा व्हावा अशी ही इच्छा प्रजेची होती. शेवटी सोमेश्वराने विक्रमादित्याला ठार करण्याचा प्रयत्न करू लागला. पण ही बातमी विक्रमादित्याला कळताच त्याने स्वतःचा दुसरा भाऊ जयसिंह याला घेवून अतिदक्षिणेकडे तुंगभद्रा नदीकडे निघाला. सोमेश्वरने त्यांचा पाठलाग करण्यासाठी सैन्य पाठविले पण हे सैन्य विक्रमादित्याकडून पराभूत झाले. विक्रमादित्य बनवासीच्या राजाला भेटून तो पुढे कोकणात गेला. कोकणचा राजा जयकेशिने विक्रमादित्याचे प्रभुत्त्व मान्य करून त्याला संपत्ती देवू केली. विक्रमादित्याने पुढे केरल राजाचाही पराभव केला. चोल नरेश राजेंद्रने विक्रमादित्यापुढे मैत्रीचा हात पुढे केला व मुलीचा विवाह विक्रमादित्याशी लावून दिला. अशा वेळी चालुक्य राज्य दोन भागात निर्माण झाले. तुंगभद्रेच्या उत्तरेकडे सोमेश्वर वर दक्षिणेकडे विक्रमादित्य. दोघांत संघर्ष अटळ झाले. या गृहयुद्धात विक्रमादित्याने सोमेश्वरचा पराभव केला व चालुक्यांच्या राजगादीवर विराजमान झाला. (इ.स. 1076)[18]

## विक्रमादित्य सहावा (इ.स.1076 ते 1126 इ.स.)

पहिल्या सोमेश्वराच्या मृत्यूनंतर मुलगा दुसरा सोमेश्वर हा राजा झााला त्याने. इ. स. 1068 ते 1076 पर्यंत राज्य केले. त्याला त्याचा अत्यंत पराक्रमी भाऊ सहावा विक्रमादित्य याचा सुरूवातीस काळात पाठिंबा मिळाला. परंतू दुसऱ्या सोमेश्वरांच्या अयोग्य वर्तणूकीमुळे सहाव्या विक्रमादित्याने आपल्या वडील भावाविरूद्ध बंड करून सत्ता आपल्या हाती घेतली. सहावा विक्रमादित्य हा अत्यंत पराक्रमी राजा होता. वडिलांच्या कारकिर्दीत

16. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.30
17. Reddy Devarakonda, ibid, Page No.38.
18. आरशरण, प्राचीन भारत का इतिहास, संस्कृती एवं पुरातत्व, प्रथम संस्करण, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली, 2002, पृ.क्र. 232.

चालुक्यांची आपल्या सत्तेचा जो विस्तार केला. त्याचे बरेच श्रेय या विक्रमादित्यांच्या कुशल सेनापतीला द्यावे लागते. गादीवर आल्यानंतर त्याने अन्हीलवाडच्या चालुक्यांचा पराभव केला. याशिवाय रट्ट आणि गुर्जरांचा पराभव केल्याचेही बिदर जिल्हयातील हालहल्ली शिलालेखात स्पष्ट होते.[19] चालुक्यांचा एक मांडलिक विष्णुवर्धन होयसळ याने हळू–हळू आपली सत्ता वाढविण्यास सुरूवात केली. इ.स. 1116 मध्ये त्याने गंगवाडीच्या प्रदेशात आपली सत्ता स्थापन केली. एवढेच नव्हे तर कदंब व पांडय राजांचा साह्य घेतले. त्यांन कृष्णा नदीपर्यंतचा प्रदेश जिंकून घेतला. तेंव्हा विक्रमादित्याशी विष्णुवर्धनाच्या पाडावाकरीता आपल्या मांडलिक राजांना मदतीला बोलाविले व विष्णुवर्धनाशी युद्ध करून त्यांचा पाडाव केला. इ.स. 1123 मध्ये विष्णुवर्धनाने पुन्हा त्याचे मांडलिकत्त्व मान्य केले. यानंतर विक्रमादित्याने गंगवाडी व चोलांपासून वेंगीचा प्रदेश जिंकून घेतला. त्यामुळे चोल सत्तेच्या ऱ्हासास वाव मिळाला. पहिल्या सोमेश्वराने साम्राज्यवादी हेतूने आपल्या राज्याचा विस्तार करण्याचे जे धोरण स्वीकारले तेच विक्रमादित्याने पुढे चालविले. व चालुक्यांचे वर्चस्व प्रस्थापित केले. सहावा विक्रमादित्य जसा पराक्रमी होता तसाच तो विद्वानांचा आश्रयदाताही होता. त्याच्या दरबारात मीताक्षरांचा लेखक विज्ञानेश्वर व 'विक्रमांकदेव चरित' चा लेखक बिल्हण हे विद्वान होते.[20]

सहाव्या विक्रमादित्याने समस्त भुवनाश्रय, परमभट्टारक, महाराजाधिराज, परमेश्वर, सत्याश्रय कुलतिलक, चालुक्याभरण अशा पराक्रमदर्शक पदव्या धारण केल्या.[21]

## सोमेश्वर तिसरा (इ.स.1126 ते 1138 इ.स.)

तिसऱ्या सोमेश्वराच्या कारकिर्दीत प्रारंभी आंध्र, मगध व द्रविड येथील राजांनी बंड केले. पण त्या सर्वांचा सोमेश्वराने योग्य तो बंदोबस्त केला. यामुळे सोमेश्वराने 'भूलोकमल्ल' अशी पदवी धारण केली. तिसरा सोमेश्वर हा राजकीय क्षेत्रात जेवढा मोठा

---

19. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – VIII, Bidar District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 2006, Page No.113
20. विश्वरूपे अ.वि., प्राचीन भारत, प्रथम आवृत्ती, पडगीलवार प्रकाशन, नागपूर, 1972, पृ.क्र. 233–34.
21. देशपांडे ग.त्र्यं., (संपादक), कोलते वि.भी., महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ द्वारा पुरस्कृत, 'विदर्भ संशोधन मंडळ' वार्षिक – 1969, प्रथम आवृत्ती, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, 1970, पृ.क्र. 42.

होता. त्याच्याही पेक्षा तो वाङःमयीन क्षेत्रात महान होता. त्याच्या वडिलांनी विक्रमादित्य सहाव्याने युद्दात पराक्रम गाजविला तर सोमेश्वराने साहित्य क्षेत्र गाजविले. तिसऱ्या सोमेश्वराने संस्कृत भाषेत मानसोल्लास म्हणजेच 'अभिलाषतीर्थ चिंतामणी' या ग्रंथाची रचना केली.[22] याने बेळगी येथील कालामुखी यती पर्वतवळीय श्रीभूवनशक्ती पंडित देवाचे शिष्य तत्पूरूष पंडित देव यास किसूकाडू –70 प्रांतातील पाळू हे गाव दान दिले होते.[23]

## जगदेकमल्ल द्वितीय (इ.स. 1138 ते 1151 इ.स.)

हा सोमेश्वर तिसऱ्याचा मुलगा होता. याच्या कारकिर्दीत मांडलिक राजांनी केंद्रीय सत्तेपासून स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करू लागली. यांच्यात होयसळ व कदंब हे प्रमुख होते पण जगदेवमल्ल याने हा प्रयत्न आपला सेनापती कालिदास याच्या मदतीने हाणून पाडला.[24] जयदेकमल्ल याने माळव्याचा परमार राजा जयवर्मन याचा पराभव करून बल्लाल नावाच्या स्वतःसाठी अनुकूल असणाऱ्या व्यक्तीस परमारांचा राजा बनविला. परमाराशिवाय गुर्जर राजा कुमारपालाचाही पराभव केला.[25]

## तैलप तृतीय (इ.स.1151 ते 1162 इ.स.)

दुसरा तैलप हा जगदेकमल्लचा लहान बंधू होता. इ.स.1151 सुमारास तो सत्तेवर आला. तेंव्हा त्याने स्वतःला 'नुर्मडीतैलप व त्रैलोक्यमल्ल' अशा उपाध्या धारण केल्या. याच्या काळात कल्याणीच्या चालुक्य सत्तेला बरीच गळती सुरू झाली. अनेक आश्रित व मांडलिक राजांनी चालुक्यांची सत्ता झुगारून स्वातंत्र्य पुकारले. बंडखोरी करणाऱ्यात कलचुरी, वंशातील बिज्जल उर्फ विज्जल याने आपल्या चालुक्यांची सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. बिज्जलाला अनेक असंतुष्टांची साथ होती. त्यात कोल्हापूरचे शिलाहार राजा विजादित्य, प्रमुख होते. अशा परिस्थितीत तेलंगण प्रातांचा काकतीय राजा

22. Yazadani G. (By Dr.A.S.Altekar) The Early History of the Deccan, Part – V, I, II, Oxford University Press, London, 1960, Page No. 370.
23. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.57
24. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Kannada Inscriptions of Maharashtra, 2001, Page No.46)
25. पांण्डे विमल चंद्र, प्राचीन भारत का इतिहास, (ई.स.250 से ई.स.1200), प्रथम आवृत्ती, एस.चंद ॲण्ड कंपनी लिमिटेड, नई दिल्ली, 2003, पृ.क्र. 392.

प्रोलराजा याने तैलपाविरूद्ध युद्ध पुकारले.[26] यात तैलपाचा पराभव झाला. याचा फायदा चालुक्यांचा सामंत असलेल्या कलचुरीवंशीय बिज्जलाने घेतला. चालुक्यांची राजधानी कल्याणीवर वर्चस्व प्रस्थापित करून तो स्वतः चालुक्यांचा राज्यकारभार पाहू लागला. इकडे पराभूत तैलपाने अन्निगरी ही छोटयाशा चालुक्य प्रांताची राजधानी बनविली. पुढे बिज्जलाने इ.स.1159 साली अन्निगेरीवर हल्ला चढवून व स्वतःला सम्राट म्हणून घोषीत केले. तेंव्हा दुसरा तैलप हा अतिदक्षिणेकडील बनवासी प्रांतात निघून गेला. अशा प्रकारे तैलप तृतीयच्या काळात कल्याणीच्या चालुक्यांची सत्ता नामशेष झाली आणि कल्याणी येथे कलचुरी वंशाची सत्ता सुरू झाली.[27]

## सोमेश्वर चतुर्थ (इ.स.1182 ते 1189 इ.स.)

तिसरा तैलप कल्याणी सोडून गेल्यानंतर कलचुरीची सत्ता सुरू झाली. परंतू त्याच्यातही अंतर्गत मतभेद निर्माण झाले. बिज्जल नंतर सोमेश्वर, मल्लुगी, आहवमल्ल हे कलचुरी वंशीय राजे होवून गेले. बिज्जलानंतर म्हणावा तसा पराक्रमी एकही राजा कलचुरी वंशात झाला नाही. याचा फायदा चालुक्य वंशातील तिसऱ्या तैलपाचा मुलगा चौथ्या सोमेश्वराने घेतला. इ.स. 1182 साली पुन्हा आपल्या घराण्याची राजगादी मिळविली. याकामी त्याचा एकनिष्ठ संस्थानिक बोम्म याचे मोठे सहकार्य लाभले. चौथ्या सोमेश्वर बोम्म यांनी कलचुरी वंशाचा समूळ नाश केला.

चौथ्या सोमेश्वराने जरी कल्याणीच्या चालुक्याची पुनर्स्थापना केली असली तरी त्यांची राजवट चिरकाळ टिकली नाही. लवकरच दक्षिणेकडील यादवांचा प्रमुख वीरबल्लाळ व उत्तरेकडील यादवांचा प्रमुख भिल्लम यांनी चालुक्य राज्यावर एकदाच हल्ला चढविला. यादवांचे बोम्म आणि चौथ्या सोमेश्वराशी युद्ध होवून यादवांनी बोम्माच्या सैन्याचा दारूण पराभव केला. पराभूत झालेला चौथा सोमेश्वर आपल्या गोव्याच्या मांडलिकांच्या आश्रयास

26. अनम कोंडा, (वारंगळ), शिलालेखात तैलप तिसरा व काकतीय राजा प्रौलराज यांच्यातील युध्दाचे वर्णन पुढीलप्रमाणे दिले आहे. 'प्रौलाने तेलपास एका क्षणात कैद केले, वैभवशाली व चालुक्यालंकार असा तैलप अस्तिविद्येत निपुण असून हत्तीवर अरूढ होऊन लढत होता. त्यास कैद केल्यावर प्रौलाने स्वामी निष्ठेखातर त्यास सोडून दिले.'

27. भावे वासुदेव कृष्ण, महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास, 'मुसलमान पूर्व महाराष्ट्र' खंड पहिला, राजकीय इतिहास, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. 78.

निघून गेला. अशा प्रकारे इ.स. 1189[28] च्या सुमारास चालुक्यांची सत्ता दक्षिण भारतातून कायमची संपुष्टात आली व दक्षिणचे नेतृत्त्व यादवांकडे आले.

## कल्याणीचे कलचुरी घराणे

भारताच्या प्राचीन इतिहासाच्या शेवटच्या काही शतकात, मध्य, दक्षिण भारतात कलचुरींनी राज्यकारभार चालविला. जवळ जवळ 700 वर्ष कलचुरीची भारतात राजकीय सत्ता होती. चालुक्यांप्रमाणेच कलचुरीच्या माहिश्मती, त्रिपुरी, सरयुपार व रन्नपुर येथे शाखा होत्या.[29] या शिवाय 12 व्या शतकात चालुक्यानंतर काही काळ कल्याणी येथून आपला राज्यकारभार चालविला या कलचूरी राजवटींनी विविध कालखंडात वेगवेगळया ठिकाणांहून राज्यकारभार चालविला. त्यांच्या राजधानीच्या शहराच्या सोबतच त्यांना घराण्याच्या नांवावरून ओळखले जाते.

कलचुरीच्या इतिहासाशी संबंधित साधने अपुरी आहेत. जी कांही आहेत ती शिलालेख, ताम्रपट व कलचुरी शासकांनी तयार केलेल्या नाण्यांमध्ये विखुरलेली आहेत.[30] कलचुरींचा इतिहास हा थोडासा दुर्लक्षित वाटतो. डॉ.भांडारकर व वा.वि मिराशी यांच्याशिवाय कोणीही कलचुरींच्या इतिहासावर प्रभावीपणे प्रकाश टाकलेला आढळत नाही. कळचुरींचा बराच इतिहास काळाच्या आड गडप झालेला दिसतो.

## कलचुरींची उत्पत्ती

कलचुरींच्या अनेक शिलालेखात त्यांच्या वंशाबद्धलचा उल्लेख आढळतो.[31] काळानुरूप त्यांच्या नांवात बदल झालेला दिसतो. त्यांच्या वंशाचे नाव कच्चुरी, कटचुरी, कलचुरली, काचच्युरी, कलतुर्य, कळचुर्य अशा प्रकारचे दिसते. नंतरच्या काही लेखात ते स्वतःला हैहय कार्तविर्य सहस्त्रार्जूनाचे वंशज समजू लागले. कलचुरींनी इ.स.249 – इ.स.

---

28. महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, इतिहास : प्राचीन कालखंड, खंड 1,दार्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई, 2010, प्र. क. 379.
29. मिराशी वासुदेव विष्णु, कलचुरी नृपति आणि त्याचा काल, प्रथम आवृत्ती, मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद, 1956, पृष्ठ क्र.7 (प्रस्तावना)
30. 'कलचुरी माहिष्मती वंशातील शंकरगण याचा 'अभोन' ताम्रपट व वेरूळ येथील रामेश्वर लेण्यासमोर सापडलेले कलचुरीचे नाणे'-
31. कोन्नुर शिलालेख, जिल्हा बागलकोट, Devarakonda Reddy, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.

250 या वर्षात आरंभ होणाऱ्या संवताचा सर्वत्र उपयोग केल्यामुळे या संवताला पुढे कलचुरि–संवत किंवा 'चेदि संवत'[32] असे नाव पडले. पण हे संवत त्यांचा नसून मूळचा अभीरांचा होता. कारण कलचुरी तिसऱ्या शतकात उदयास आले नव्हते.[33]

इतर वंशाप्रमाणेच कलचुरी राजांनी आपला संबंध पुराणातील प्रसिद्द किर्तीवीर्य हैहयाशी जोडतात. हैहय उर्फ सहस्त्रार्जूनाने आपल्या सहस्त्र बाहुंचा बांध घालून नर्मदेचे पाणी अडविले व त्यामुळे त्या नदीच्या तिरावरती शिवपूजा करीत बसलेल्या रावणाने भगवान शंकराला वाहिलेली फुले पाण्याच्या ओघांत वाहून गेली तेंव्हा रावणाने रागाने कार्तवीर्य सहस्त्रार्जुनांशी युद्ध केले. पण तो पराजय पावल्यामूळे कैलासालाही हलवणाऱ्या त्या बलाढय रावणाला सहस्त्रार्जूनाच्या बंदीखान्यात कांही काळ घालवावा लागला. या पौराणिक गोष्टींचे रसभरित वर्णन कलचुरींच्या अनेक दानपत्रांच्या आरंभ आढळते.[34] एकंदर पाहता तत्कालीन प्रथेप्रमाणे आपला वंश श्रेष्ठ दाखविण्याची कुण्यातरी पौराणिक पराक्रमी व्यक्तींशी संबंध दाखविण्याचा प्रयत्न कलचुरींनी केलेला दिसतो.

## कलचुरीच्या प्रमुख शाखा

भारतीय इतिहासात कलचुरींच्या वेगवेगळया कालखंडात विविध शाखा उदयास आल्या त्यातील कांही प्रमुख व आपल्या विषयाशी संबंधित शाखांची राजकीय माहिती घेवू. महिष्मती किंवा आद्यकलचुरी शाखा माहिष्मतीच्या राजधानीच्या ठिकाणावरून या शाखेला माहिष्मती शाखा असे म्हटले जाते. शिवाय कलचूरी इतिहासात सर्वात प्राचीन शाखा म्हणून या कलचुरी शाखेचा उल्लेख आद्यकलचूरी शाखा असाही केला जातो. या शाखेने सहाव्या शतकात उत्तर महाराष्ट्र, गुजरात आणि माळवा प्रांतात राज्य केले. उपलब्ध शिलालेखांनुसार माहिष्मतीचा राजा सुबंधू[35] (इ.स.486) अनुपचा राजा स्वामीदास (इ.स. 386), भुलुंड (इ.स.426) आणि रूद्रदास (इ.स.436) यांचा पराभव केला. या सुमारास दक्षिण

32. 'कदाचित त्याच्या 'चेदी' या राजधानीच्या शहरावरून 'चेदी संवत्सर' हे नाव पडले असावे'.
33. जोशी लक्ष्मण शास्त्री (संपादक), मराठी विश्वकोश, खंड तिसरा, प्रथम आवृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य, संस्कृती मंडळ, 1976, पृ.क्र. 366.
34. मिराशी वासुदेव विष्णु, कलचुरी नृपति आणि त्याचा काल, प्रथम आवृत्ती, मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद, 1956, पृ.क्र. 2.
35. पाचव्या शतकाच्या शेवटी, कलचुरीनी सुबंधुचा पराभव करून 'महिष्मती' ही राजधानी बनवली व पुढे याच नावाने हा कलचुरी वंश इतिहासात प्रसिध्द आहे.

भारतात पराक्रमी बदामीच्या चालुक्यांची सत्ता होती तर गुजरातमध्ये भडोचच्या गुर्जरांची सत्ता होती. कलचुरींमध्ये एकाच वेळी दोन्ही शत्रूंशी युद्ध करण्याची क्षमता नसल्या कारणाने त्यांनी आपले ठिकाण बदलले. ते माळवा प्रांतात आले पण येथेही मैत्रकांच्या विरोधामुळे त्यांना जबलपूरच्या प्रदेशात वास्तव्य करावे लागले. येथेच कलचुरीं आपली शक्ती वाढविली. या वंशातील कृष्णराज, शंकरगण व बुध्दराज हे अतिशय पराक्रमी राजे होवून गेले. हे शैव संप्रदायाचे अनुयायी होते. कृष्णराजाने कृष्णराज रूपक नावाचे चांदीची नाणी वापरात आणली. या नाण्यावर परममाहेश्वर असा उल्लेख आहे. दुसऱ्या बाजूला शिवनंदीची प्रतिमा कोरलेली दिसते. यानंतरही तो बरेच दिवस नाशिक, मुंबई, सुरत या प्रदेशात आणि कल्याणीच्या चालुक्य राज्यात चलनात होता. शंकरगण प्रभावशाली व पराक्रमी राजा होता. त्याने नाशिक जिल्हा, उत्तरेत माळवा आणि गुजरात काठियावाड प्रांतावरही तो राज्य केला असावा. शंकराजा धार्मिक वृत्तीचा होता. त्याने उज्जैन व नाशिक परिसरातील जमीन दान केली. बुद्धराज (इ.स.595) याने वैदिक येथून (इ.स.608) मध्ये एक दानपत्र प्रसिद्द केले. बुद्धराजाने पूर्व माळवा प्रांत शशांकांच्या मदतीने देवगुप्ताकडून जिंकून घेतला. पित्याप्रमाणे हाही धार्मिक वृत्तीचा असल्याकारणाने (इ.स.609) मध्ये भरूकच्छ जिल्हयातील एका भूमि अनुदानाच्या (इ.स.609) स्वरूपात दान केली. (इ.स. 602) साली निर्माण केलेल्या शिलालेखांवरून समजते की, चालुक्य राजा मंगलेशशी (इ.स. 597–611) युद्ध केले.

बडोदा येथील मंकरीच्या शिलालेखांवरून समजते की, जेंव्हा शंकरगण यशाच्या शिखरावर अरूढ होता त्या वेळी महाराज नन्न, ज्यास 'कलचुरी कुलवंशीय प्रदीप' असे म्हटले गेले. तो सामंत होता. त्याच्या पत्नीचे नाव दंद्या आणि मुलगा तरलस्वामी (इ.स. 594) हे होते.

कलचुरींना हैहय असेही म्हटले जाते. चालुक्य राजा विनयादित्य दुसरा इ.स. 733–746 याने हैहय राजकुमारिंशी विवाह केलेला होता.[36] महिश्मतींनी जवळ जवळ तीनशे वर्ष माळवा, गुजरात, उत्तर महाराष्ट्रात राज्यकारभार केला.

---

36. मुखर्जी राधाकुमुद, प्राचीन भारत, छठी आवृत्ती, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, 2004, पृ.क्र.141.

## त्रिपुरीचे कलचुरी

कलचुरी शाखांतील दुसरी प्रभावशाली ही शाखा म्हणून त्रिपुरीच्या कलचुरींकडे पाहिले जाते. शिवाय कलचुरी हे राजपुत असल्याचे बऱ्याच विद्वानांनी मान्य केले आहे. या कलचुरींच्या शाखेची सत्ता नवव्या शतकात उदयास आली. त्यांचे राज्य तत्कालीन जैजाकभुक्तींच्या प्रमाणे हे स्वतःस हैहय वंशीय क्षेत्रिय समजत. गुर्जर प्रतिहार व बदामीच्या चालुक्यांच्या राज्य विस्तारास अगोदर गुर्जर प्रतिहर व बदामीच्या चालुक्यांच्या राजाच्या साम्राज्यवादी नीतीमुळे त्याचे राज्य संकुचित बनून त्यांची राजधानी त्रिपूरी बनली आणि याच कारणावरून या शाखेला 'त्रिपूरीचे कलचूरी' असे म्हटले जाते. यांनी इ.स. च्या 9 व्या शतकापासून ते 12 व्या शतकापर्यंत राज्य केले.

## शरयुपारचे कलचुरी

कलचुरी नृपती वामराजदेवाने आठव्या शतकात आयोमुख (बरेली व प्रतापगड जिल्हे) प्रदेशावर आक्रमण करून तो प्रदेश स्वतःच्या लक्ष्मणराज नामक लहान भावास दिले. या वंशास सरयुपारचे कलचुरी असे म्हणतात. या शाखेबद्धलची फारशी माहिती उपलब्ध नाही. कुशानगर व तेथून चाळीस मैलावरील कहला गावात या शाखेशी संबंधित ताम्रपट सापडले त्यात या शाखेतील राजांची वंशावळ आढळते.[37]

कल्याणीच्या चालुक्यानंतर उदयास आलेला हा प्रसिद्ध वंश. चालुक्यांची राजधानी कल्याण हीच कलचुरींचीही राजधानी, यामुळे या वंशाला कल्याणीचे कलचुरी असे म्हणतात. दक्षिणेत या शाखेने इ.स.1116 ते इ.स.1184 पर्यंत राज्य केले.[38] या वंशातील जोगम याची राजधानी सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा ही होती. तो कल्याणी चालुक्यांचे सामंत म्हणून राज्यकारभार केला.[39] या वंशातील प्रसिद्ध राजा हा बिज्जल असून त्याच्या नंतर येणारे कलचुरी वंशीय राजे निष्क्रिय असल्यामुळे पुन्हा चालुक्यांनी सत्तेची पुनर्स्थापना

---

37. मिराशी वासुदेव विष्णु, कलचुरी नृपती आणि त्याचा काळ, प्रथम आवृत्ती, मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद, 1956 पृ.क्र.28.
38. देगलूरकर गो.ब., मराठवाडयाचे कलचुरी, प्रथम आवृत्ती, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, 1969, पृ.क्र.187.
39. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 2001, Page No.189

केली. पण त्यांनाही टिकविणे मुश्किल झाले. त्याचा पुर्ण प्रदेश यादवांच्या वर्चस्वाखाली गेला.

कल्याणीच्या चालुक्यानंतर चालुक्यांच्या गादीवर आलेल्या बिज्जल व त्याचे वंशज आपला मूळ वंश चेदीच्या कलचुरींशी जोडतात. (बॉम्बे गॅझीटियर, भाग 2रा). बिज्जलाचा मूळ पुरूष कृष्ण हा नाशिकच्या परिसरात मांडलिक या नात्याने राज्य करीत होता. त्याचा पुत्र शंकरगण व शंकरगणाचा मुलगा बुद्ध. इ.स.607 च्या सुमारास बुद्ध कलचुरींच्या गादीवर आला असता बुद्धानंतर कृष्ण उर्फ कन्नम्मा हा कलचुरींचा वारस ठरला. तो इ. स.1042 साली त्याला राजगादी प्राप्त झाली. तो स्वतःस त्रिकलिंगाचा राजा समजत असे. दोघे पुत्र होते. कन्नमास बिज्जल पहिला व राज किंवा राजल असे दोघे पुत्र होते. राजस याव, अमुगी, संकम, पहिला, कन्नर व जोगम असे चार मुलं असून जोगमाचा पुत्र पेरमाजी उर्फ हेमाडी हा चालुक्य सम्राट सोमेश्वर तिसरा याचा इ.स.1128 च्या सुमारास मांडलिक होता. याचा सेनापती मदवनय्या हा अतिशय पराक्रमी असल्याचा उल्लेख उंबरनी, जिल्हा सांगली येथील शिलालेखात येतो.[40] हेमाडीचा पुत्र बिज्जल दुसरा याने चालुक्यांचे राज्य हस्तगत केल्यावर त्रिभुवन मल्लदेव व कालंजरपुराधिश्वर या पदव्या धारण केल्या.[41] शेवटच्या पदवीने त्याचे घराणे चेदी प्रांतातील असल्याचे दिसते.[42] यादव कालीन मार्डी शिलालेखात शके 1143 यात कलचुरींची वंशावळ दिली आहे. बिज्जण उर्फ बिज्जल याचा मुलगा सोम नंतर मल्लुगि व मल्लुगीनंतर संकम.[43] या शिलालेखात संकमदेवापर्यंत कलचुरींची वंशावळ देवून पुढे यादवांच्या वंशावळीला भिल्लमापासून सुरूवात केलेली आहे. संकमदेवाच्या कारकीर्दीत दिलेल्या दानाचा काळ शके 1102 आहे व भिल्लमाच्या कारकीर्दीत दिलेल्या दानाचा काळ 1109 आहे यावरून असे अनुमान काढता येते की, भिल्लमाने शके 1102 ते 1109 च्या दरम्यान केव्हा तरी सोलापूरच्या बाजुची कलचुरींची

---

40. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 2001, Page No.168
41. Upadhya G.N., ibid, Page No.123
42. भावे वासुदेव कृष्ण, महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास, 'मुसलमान पूर्व महाराष्ट्र' खंड पहिला, राजकीय इतिहास, प्रथम आवृत्ती, पृ.क्र.82.
43. 15– श्रीमत्कलयुरीवश वारी शौ श्रीनिकेतनेरेजंते ते महिपालमन यः सूर्य तेजसः
16– तंत्रये यत्रोधन परवैरिवनिताको–स्य यात्रों द्यमः नोत्पाठनमंत्ररात्रु निकट प्रोत्पारंन पाटनं।
चापास्फलन .... क ..... धृतवार्भालात्थरास्फलानं यस्मासौ पृथिवीतले विनयते श्री बिज्जणल्ली (क्षमा) परिः।

सत्ता नष्ट केली असावी.[44] सोलापूरच्या कपिलसिद्ध मल्लिकार्जुनाशी संबंधित असलेल्या 22 शिलालेखांपैकी 21 शिलालेखांमध्ये या वंशातील राजे आणि अधिकाऱ्यांची नावे आढळतात.[45]

## बिज्जल द्वितीय (इ.स. 1162 – इ.स.1167)

या वंशातील प्रसिद्ध राजा बिज्जल इ.स. 1127 पासून मंगळवेढा प्रांताचा राज्यकारभार पाहत होता. सोलापूर जिल्हयातील मळकवठे शिलालेखानुसार त्याच्या पत्नीचे नाव रंभादेवी होते.[46] इ.स. 1142 मध्ये कऱ्हाटक 4000 (कऱ्हाटक म्हणजे सांगली व साताऱ्याचा दक्षिणस प्रदेश) प्रदेशाचा कारभार त्यांच्याकडें आला. याशिवाय भीमा नदीकाठचे तरडवाडी म्हणजे विजापूर प्रदेशाचा कारभार इस. 1147 पासून त्याच्याकडे आला. उत्पन्नाच्या दृष्टिनी सगळयात मोठा प्रदेश कऱ्हाटक प्रांत सांगली व दक्षिण सातारा प्रदेश होता. कऱ्हाट, तरडवाडी व मंगळवेढा या तिन्ही प्रदेशाचा कारभार मंगळवेढा या राजधानीतून पाहिला जात असे. कलचुरी घराण्याच्या राज्यांच्या दोन तृतियांश प्रदेश आजच्या महाराष्ट्रात तर एक तृतीयांश प्रदेश विजापूर जिल्ह्यात येतो.

मंगळवेढा राज्य चालुक्यांचे मांडलिक राज्य होते. बिज्जलाच्या कालखंडात कल्याणमध्ये चालुक्य राजा तृतीय तैलप हा राज्य करीत होता. तो बिज्जलाचा सख्खा मामे भाऊ होता. तैलपा हा बिज्जलापेक्षा अनुभवाने व वयाने लहानच होता. तो साधा, कमकुवत व निष्काळजी होता. त्याच्या कारकिर्दीत चालुक्यांचे कांही जुने मांडलिक राजे स्वतंत्र होण्यासाठी चालुक्य तैलपा विरूद्ध बंड करण्याच्या विचारात होते. बिज्जलाचा गुप्त हेरांमार्फत त्यांचा सुगावा लागला. स्वतंत्र होण्यासाठी महत्त्वाकांक्षा बाळगुन कट करण्याच्या विचारात असलेले मांडलिक सामंत म्हणजे काकतिय प्रोला द्वितीय, वरंगळ आंध्र, 2. शिलहार विजयादित्य कोल्हापूरच्या शिलहार गंगरादित्याचा मुलगा कऱ्हाड सांगली व दक्षिण सातारा, 3. होयसळ नरसिंह प्रथम हळ्ळेबिड जि.हासन हे मांडलिक

---

44. खरे ग.ह., दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, भाग चौदा, प्रथम आवृत्ती, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, 1930, पृ.क्र.43.

45. कलबुर्गी एम.एम., विजया तेलंग, (अनुवाद) महाराष्ट्रातील कन्नड कोरीव लेख, प्रथम आवृत्ती, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, जानेवारी 2007, पृ.क्र.58.

46. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 2001, Page No.254

राजे होते. बिज्जळ हा महत्त्वाकांक्षी, धाडसी, योजक, दूरदर्शी, कल्पक व रणधुरंधर योद्दा होता. चालुक्य घराण्याच्या तीन पिढयांशी त्याचे रक्तसंबंध होते त्यांने परिस्थितीचे गांभीर्य ओळखले. ही सुवर्णसंधी आपण गमावता कामा नये हे ही त्याच्या मनाने हेरले.

चालुक्य तृतीय तैलप बंड करणाऱ्या वरंगळच्या काकतीय प्रोलावार एकाकी चालुन गेला. यात तृतीय तैलपाचा पराभव झाला. त्याने जून 1157 मध्ये कल्याण सोडले. तो बंडाच्या परिस्थतीवर नियंत्रण करू शकला नाही. म्हणून आपल्या मामाचे राज्य वाचविण्यासाठी कलचुरी बिज्जल मंगळवेढयाहून सैन्य इ.स.1157 मध्ये कल्याणला आला. सर्व राजकीय अधिकार एकवटले परिस्थितीवर शक्ती–युक्तीने नियंत्रण मिळविले अशा तऱ्हेने कलचुरी वंशी राजा बिज्जळ कल्याणीचा इ.स.1162 साली राजा झाला.

बिज्जळाचे राज्य मंगळवेढा शिवाय बनवासी, सध्याचा (कनाडा जिल्हा व शिमोगा जिल्हा, कर्नाटक) आणि चित्रदुर्ग विभागाएवढे दक्षिणेत पसरले होते. आता त्याने मंगळवेढा येथील विश्वासपात्र मंत्री व अधिकारी राजधानी कल्याण येथे बोलाविले. या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये लिंगायत संप्रदायाचे बसवेश्वर भांडारी म्हणजे प्रमुख कोषाधिकारी पदावर होते.

## बिज्जळाचे विश्वासू सहकारी

1. विजय पांडय – नोलांबवाडी (जि.दावणगिरी) इ.स. 1150 ते इ.स. 1158.
2. कस्यप नायक – बनवासी इ.स. 1155 ते इ.स.1158 प्रशासक उत्तर कनाडा आणि (जि.शिमोगा) सहकारी अधिकारी म्हणजे महादेव व केशव
3. दंडनायक मैलरायच्या तरडवाडी, विजापूर विभाग (मंगळवेढा राज्य)[47]
4. सिंद्धवंशीय वीर विक्रमादित्य – करवळी तीस[48]

बिज्जळाच्या कारकिर्दीत कलचुरी आणि कोल्हापुरच्या शिलहारांमध्ये संघर्ष उद्भवला. याचे वर्णन 17 व्या शतकातील पार्श्वकवीने निंब सामंत चरिते नावाच्या भामिनीषटपदी छंदात, कन्नड महाकाव्यात लिहीले आहे. कोल्हापूरच्या पंचगंगा नदीच्या काठावर लिहार राजा गंडरादित्याच्या बाजूने बिज्जळांशी लढतांना निंब सामांतने वीरमरण

47. मेनकुदळे अशोक गंगाधर, बाराव्या शतकातील आद्य समाजसुधारकः महात्मा बसवेश्वर, प्रथम आवृत्ती, सुविधा प्रकाशन, सोलापूर, फेब्रुवारी 2003, पृ.क्र. 6.

48. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No. 169.

प्राप्त करून स्वर्गारोहण केले हा या काव्याचा विषय आहे. या काव्यातील उल्लेखाप्रमाणे गंडरादित्य आणि बिज्जल समकालीन असने काळाच्या दृष्टीने सुसंगत नाही आणि हे युद्ध बिज्जल आणि गंडरादित्याचा मुलगा विजयादित्य यांच्यामध्ये झाला असावा. असा विद्वानाचा अंदाज असला तरी ही लढाई बिज्जळ आणि गंडरादित्य यांच्यामध्येच झाली असावी. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात सापडलेल्या औराद कोरीव लेखात 1135 इ.स. बिज्जळाच्या एका अधिकाऱ्याने गंडरादित्याचा पराभव केल्याचा उल्लेख सापडतो.[49] बिज्जळाने बनवासी, सिंदवडी एराम्बर्गे, तार्दावाडी, करहाटक आणि सौदात्ती या प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित केलेले होते.

बिज्जलाच्या कारकिर्दीतील सगळयात महत्त्वाची घटना म्हणजे वीरशैव संप्रदायाचे रूपाने झालेल्या शैव संप्रदायाचे पुनरूस्थापन हे होय.[50] लिंगायत संप्रदायाचे श्री बसवेश्वरांनी विविध जातीचे लोक एक केले. त्यांच्यात सामाजिक ऐकोपा वाढावा यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले. मूळचा ब्राह्मण व चांभार असलेल्यांच्या मुलामुलींचा विवाह बसवेश्वरांनी करविला. तत्कालीन कर्म सनातानी लोकांना हे आवडले नाही. त्यांनी राजा बिज्जळावर दबाव टाकला. बिज्जळाने त्या दोघां शिवशरणांचे डोळे काढून त्यांना हत्तीच्या पायी दिले. ही घटना बसवेश्वरांच्या अनुयायांना आवडली नाही त्यांनी बिज्जळाची हत्या घडवून आणली.[51]

## सोमेश्वर (इ.स. 1167 – इ.स. 1173)

राजा बिज्जलाला एकूण पाच पुत्र व एक कन्या होती.

1. श्रीयादेवी / श्रीदेवी (मुलगी)
2. सोमेश्वर किंवा वज्रदेव उर्फ कालीदेव इ.स. 1167
3. रायमुरारी सोविदेव उर्फ वीर बिज्जळ किंवा बिज्जळ तृतीय इ.स. 1173 ते इ.स. 1175
4. मल्लिकार्जून उर्फ मैलुगी इ.स. 1175 ते 1177

---

49. कलबुर्गी एम.एम., विजया तेलंग, (अनुवाद) महाराष्ट्रातील कन्नड कोरीव लेख, प्रथम आवृत्ती, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, जानेवारी 2007, पृ.क्र. 62.
50. देगलूरकर गो.ब., मराठवाडयाचे कलचुरी, प्रथम आवृत्ती, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, 1969, पृ.क्र..190.
51. पाठक प्रभाकर पां., चेतनाचिंतामणी, श्री बसवेश्वर, सुविधा प्रकाशन, सोलापूर, ऑक्टोंबर 2005, पृ.क्र. 11.

5. संकमा द्वितीय इ.स. 1177 ते 1178

6. आहवमल्ल इ.स. 1178 ते इ.स. 1189

सोमेश्वर हा बिज्जलाचा प्रथम पुत्र असल्यामुळे व तत्त्कालीन परंपरेनुसार बिज्जलाचा राजकीय वारस सोमेश्वर बनला. पूर्वी त्याच्याकडे मंगळवेढा प्रांताचा कारभार सोपविण्यात आलेला होता. त्याचा सातारा जिल्ह्यात भिवघाट येथील शिलालेख प्रसिद्द असून त्यात त्याने समस्त भुवनाश्रय, पृथ्वीवल्लभ, महाराजाधिराज, परमेश्वर, परममाहेश्वर, काळंजर, पुरावराधीश्वर, कळचुर्यकुलकमलमार्तडय, कलचुर्ग, कुलप्राप्त, चक्रवर्ती, अशी बिरूदे धारण केली. याचा सेवक महाप्रचंडदण्डनायक म्हणजे मुख्य न्यायाधिश याच्या विनंतीवरून त्याने उत्तरायण संक्रमण पर्वकाळी पाडे नाडातील करजय गावातील दोनमत्तर जमीन भीमाशंकर देवास दान केली. त्याची राणी बागलदेवी हिच्या विनंतीवरून त्याने चौदा ब्राह्मणांना व सोमेश्वर देवाला शक 1096 इ.स.1174 जमिनी दिल्या. त्याच्या कारकिर्दीत महत्त्वाचा युद्ध प्रसंग घडला नाही. तथापि त्याच्या राज्यातच कलचुरीचा अंमल मानण्याकडे अद्यापि रयतेची प्रवृत्ती नसल्यामुळे सोमेश्वराचे बरेच सामर्थ्य त्यात खर्ची पडले असावे. कारण बनवासिदसहस्त्र या प्रांतातील महसूल देण्याचे तेथील मांडलिकांनी नाकारल्यावर सोमेश्वरास आपले दोन सेनापती एप्रिल 1173 मध्ये त्यांच्या परिपित्यर्थ सैन्यानिशी पाठवावे लागले. त्यांच्या सैन्याचा तळ तुंगभद्रेच्या पुर्वेकडे पडला असता त्यांच्यावर स्थानिक जहागिरदारांनी चारही बाजूंनी हल्ला केला व मोठे युद्ध झाले. हा विरोध त्यांनी चालुक्यांचे पक्षपाती म्हणूनच केला असावा हे उघड आहे. कारण यावेळी तैलपाचा पुत्र सोमेश्वर चालुक्य यांच्या वर्चस्वाखाली बेल्लारी व परिसर होता.[52]

## मल्लुगी (इ.स. 1175 – इ.स. 1177)

सोमेश्वर इस. 1175 च्या सुमारास मरण पावल्यानंतर त्याचा धाकटा भाऊ रायमुरारी सोवीदेव उर्फ वीर बिज्जल तिसरा हा राजगादीवर बसला तो पराक्रमी होता.[53] मलय चोल, गुर्जर या प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित केले. इ.स. 1165 च्या सुमारास सांगली जिल्हयातील जत परिसरात त्याचे शिलालेख आढळतात. त्याचा सेनापती कप्पदेव गोमती

---

52. भावे वासुदेव कृष्ण, महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास, 'मुसलमान पूर्व महाराष्ट्र' खंड पहिला, राजकीय इतिहास, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. 80.

53. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 2001, Page No.181

हा होता. जत तालुक्यातील उंबरणी शिलालेखानुसार पेर्मोडी या सामंताच्या मदतीने राजांचा विस्तार करण्याचा त्याने प्रयत्न केला. तो दानशील राजा होता. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा लहान भाऊ मल्लुगी याला कलचुरींची राजगादी मिळाली.[54] त्याला यादव राजा चौथा भिल्लम हा शत्रू रूपात भेटला. दोघात युद्ध होवून यात मल्लुगीचा पराभव झाला. या युद्दात भिल्लमाने कल्याणी हे राजधानीचे शहर जिंकले. त्यामुळे कलचुरींना जुनी राजधानी मंगळवेढयाचा आश्रय घ्यावा लागला. शके 1098 इ.स. 1176 च्या सुमारास वऱ्हाड प्रांतात अकोल्याजवळ अग्नेयेस सहा कोसांवर वाशी टाकळी या गावावर मालुगी देवाचा पुत्र राजय याने स्वारी केली. त्यागावी तरूण राजा हेमादिदेव हा राज्य करीत होता. पण त्या स्वारीत राजलचा पराभव झाला. त्याच्या नंतर इ.स.1177 साली संकमदेवास राजगादी प्राप्त झाली. याचा उल्लेख कुंचनूर शिलालेखात येतो.[55] त्यानेही दोनच वर्ष राज्य केले. त्याच्या महाप्रधानाने सोमेश्वराप्रमाणेतच भीमाशंकरास जमिन दिली असून त्याला दानपत्रात संकमास कळचुर्य कुलप्रताप चक्रवर्ती व निःशंकमल्ल अशा पदव्या आहेत. गादीवर येण्यापूर्वी संक हा बेल्लारी जिल्हयात महासामंत असून सिंदराजा त्याचा मांडलिक होता. राज्यातील इतका महत्त्वाच्या अधिकाऱ्यामुळे त्याला राज्यप्राप्ती झाली. त्याच्या कारकिर्दीत होयसळ राजा बल्लाळ दुसरा म्हैसुरचा राजा होता.[56]

### आहवमल्ल (इ.स. 1178 – इ.स. 1189)

संकमाच्या नंतर त्याचा लहान भाऊ आहवमल्ल याने इ.स. 1180 मध्ये कलचुरीची राजगादी मिळविली. त्यावेळी बम्म उर्फ ब्रह्म या सरदारान सोमेश्वर चालुक्य याचा पक्ष उघडपणे घेवून त्यांच्या नावाची इ.स.1183 मध्ये द्वाही फिरविली. अनंतपूर जिल्हयातील रयतेनेही त्याचाच कित्ता गिरवून सोमेश्वरास आपला राजा मानले. पुढे कदंबराजा कोंडम यानेही इ.स. 1187 मध्ये कलचुरींचे वर्चस्व मान्य केले. इ.स.1189 मध्ये कुंतल विषय म्हणजे बेळगाव जिल्हयाचा काही भाग सोमेश्वरांच्या सत्तेखाली आला. अशा रितीने

---

54. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 2001, Page No.159
55. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.112
56. भावे वासुदेव कृष्ण, महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास, 'मुसलमान पूर्व महाराष्ट्र' खंड पहिला, राजकीय इतिहास, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. 86.

दक्षिणेकडून कल्याण चालुक्यांनी पुन्हा मुळ प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित केले. उत्तरेतून यादवही आपला राज्यविस्तार करू पहात होते. या दोघांशिवाय द्वारसमुद्राचा होयसळ राजा बल्लाळ दुसराही कलचुरींचे राज्य जिंकण्याची संधी पाहत होता. बिज्जलानंतरचे कलचुरी वंशीय राजे दुर्बल असल्यामुळे त्यांना फितूरी परचक्रे व वेदिली यांची भर पडल्यामुळे आहवमल्ल, कलचुरी कुंकवाचाच धनी राहिला.[57] अशा प्रकारे कलचुरी वंशीय बिज्जल दुसऱ्याने महाप्रयासाने प्राप्त केलेले कल्याणीच्या चालुक्याचे राज्य अवघ्या पन्नास वर्षाला यादवांनी आपल्या वर्चस्वाखाली आणला. आता दक्षिणेकडीत महासत्ता म्हणून देवगिरीच्या यादवांकडे पाहिले जावू लागले. दक्षिणेत मुस्लीम आक्रमणे होईपर्यंत यादव प्रबळ होते.

## वन्हिकुल शाखा

इ.स. च्या दहाव्या शतकात निर्माण झालेल्या उत्तर (कल्याणी) चालुक्य राज्य तत्त्कालीन दक्षिण भारतातील सामर्थ्यवान असणाऱ्या राज्य घराण्यापैकी एक होते. चालुक्यांची सत्ता उत्तरेला गोदावरी पासून ते दक्षिणेला तुंगभद्रा, कावेरीपर्यंत विस्तृत भूप्रदेशात निर्माण झालेले होते. अनेक राज्यांनी चालुक्यांचे मांडलिकत्त्व स्वीकारलेले होते. त्यापैकी नांदेडच्या दक्षिणेस गोदावरी व मांजरा या महाराष्ट्रातील प्रमुख दोन नद्यांच्या दुआबात वन्हिकुलोत्त्पन (Fire Family) नावाचे एक राजवंश राज्य करीत होते. देगलूर (जिल्हा नांदेड, महाराष्ट्र) तालुक्यातील होट्लूर किंवा होट्टल हे या मांडलिक राजाचे किंवा चालुक्याच्या उपराजधानीचे ठिकाण होते. या वन्हिकुलोत्त्पन राजाच्या अधिपत्याखाली दोन हजार गाव असलेला विस्तृत भाग गोदावरी व मांजरा या नदयांच्या दरम्यानचा होता. होट्टलच्या संस्कृत शिलालेखात या वन्हीकुलास ''विषद्ग्रामशतपति'' असे म्हटले आहे.

या राजवंशाला वन्हिकुलोत्त्पन या नावाने ओळखले जाते. मांजरा नदीचे प्राचीन नाव ''वांजरा'' असे होते. या वांजरा नदी प्रदेशात निर्माण झालेल्या व तेथेच राज्य करणाऱ्या राज्यकुळास ''वन्हिकुलोत्त्पन्न'' असे नाव प्राप्त झालेले असावे. देगलूर, मुखेड, बिलोली या नांदेड जिल्हयातील तालुक्यांचा भाग मिळून प्रत्येकी एक हजार गावाचा

---

57. भावे वासुदेव कृष्ण, महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास, 'मुसलमान पूर्व महाराष्ट्र' खंड पहिला, राजकीय इतिहास, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. 87.

विभाग अशा दोन विभागामध्ये उत्तर चालुक्यांचा मांडलिक राज्याची सत्ता चालत होती. ''अर्ग'' नावाच्या राजावरून ओळखिला जाणारा देगलूरकडील एक हजार खेडयाचा यरगी विषय एक सहस्त्र मंडल व दुसरा अव्वावाडी सातशे, सक्करगे ऐशीं व जुन्नीवळगे विषय इत्यादी मुखेड, बिलोली प्रदेशात समाविष्ट होणारा यरगीचा सायेरबार किंवा सहस्त्र मंडल असा दुसरा भाग. अशा या मांडलिकांची राज्यसिमा होते. बिलोली तालुक्यातील सगरोळी किंवा सव्वरवल्ली हा चोवीस गावाचा भाग त्या काळी प्राचीन बोडन किंवा बोधन या सातशे गावाच्या मंडळात समाविष्ट होता.[58]

उत्तर चालुक्याच्या इतिहासात या वन्हिकुलाची माहिती आतापर्यंत अज्ञात स्वरूपात होती. यामुळे नविन उपलब्ध झालेल्या या होट्टल परिसरातील शिलालेखाचे महत्त्व व ऐतिहासिक वाटते. होट्टलच्या संस्कृत शिलालेखावरून या वन्हिकुलाची उत्पत्ती अगस्ती ॠृषीने दुष्टाचा निर्दय करणाऱ्या यज्ञाच्या अग्नीकुडांतून निर्माण झालेल्या मुनीमानससिद्ध नामक एका वीरपुरूषापासून झाली असे समजते.[59]

गोदावरी व मांजरा या नद्यांच्या परिसरात एका पर्वतावर अगस्ती ॠृषीचा आश्रम होता. शिलालेखातील हा अगस्ती ॠृषीचा उल्लेख अगस्ती विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेत आले. या प्रसिध्द कथेशी व घटनेशी संबंध असल्यामुळे मोठा अर्थपूर्वक व सूचक वाटतो. महाराष्ट्र संपल्यानंतर गोदावरी मांजरा नदीच्या दक्षिणेपासून आंध्र किंवा तेलगंणा प्रातांची सुरूवात होते, हे या कथेतून सूचित झाल्याचे वाटते.[60]

## वन्हिकुल वंशाची वंशावळ

या वंशाचा पहिला ऐतिहासिक पुरूष 'राजा ध्रुव' किंवा 'धोर' हा होय. याच्या पुत्राचे नाव उत्तम असे होते. पुढे त्याचे वंशज – पहिला कलिचोरस (उत्तमचा मुलगा) अर्ग (कलीचोरस प्रथमचा मुलगा), कलीचोरस दुसरा (हा अर्गचा मुलगा अथवा पुतण्या असावा), राजाध्रुव किंवा धोर याचे नाव उत्तर चालुक्य राज्याचा मूळ संस्थापक दुसरा तैलप याने उत्तरेत परमार राजा मुंज यांचाशी ज्या लढाया केल्या त्यात प्रथम आढळते. या राजवंशाने सुरूवातीस राष्ट्रकुटाच्या अधीन राहून करडखेल परिसरात राज्यकारभार सांभाळला.

58. जोशी सु.ग., मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक 1974, प्रथमावृत्ती, राधाकृष्ण रामचंद्र प्रकाशन, शिरूर ताजबंद, 1974, पृ.क्र. 17.
59. चालुक्याच्या उत्पत्तीबद्दलही असा पौराणिक सिद्धांत सांगितला जातो.
60. जोशी सु.ग., उपरोक्त, पृ.क्र. 8.

राष्ट्रकुटांच्या उतरत्या काळात चालुक्य राजा तैलप याचे अधिनस्त स्वीकारले.[61] यावरून चालुक्यांचे हे मांडलिक राजकुल सुरूवातीपासूनच (इ.स. 973) या भागात अस्तित्त्वात होते हे लक्षात येते. होट्टल व करडखेल या शिलालेखावरून ध्रुव किंवा धोर राजा, उत्तम, पहिला कलीचोरस, अर्ग आणि दुसरा कलीचोरस ही नावे थोडयाफार फरकाने बरोबर दिसतात. करडखेलच्या शिलालेखात राजा अर्ग याला राजा कर्क या नावानेही संबोधले आहे. दुसरा कलिचोरस हा राजा अर्ग याचा पुतण्या असावा. या मांडलिक राजांना 'महामंडलेश्वर' अशी पद्‌वी होती व ते प्रांतीक राज्यपालाच्या योग्यतेचे होते. यांच्या पराक्रमाची, शुर कृत्यांची, दानशुरतेची व परोपकाराची माहिती होट्टलच्या संस्कृत शिलालेखात वर्णिलेली आढळते.[62] या वंशातील रब्बनायकाची पत्नी रब्बलदेवी ही सगरोळी (जिल्हा नांदेड) परिसरातील स्त्री प्रशासक होती. हिने अनेक युद्‌धात सहभाग नोंदविल्याचा उल्लेख करडखेल व सगरोळी शिलालेखामध्ये येतो.[63]

## वन्हिकुल राजवंश व कालामुख संप्रदाय

अर्ग राजा ज्यास 'कर्क' या नावानेही ओळखले जाते. हा राजा मोठा शिवभक्त, दानशील व परोपकारी होता. याचा मित्र वैश्य सिद्दगी हाही शिवभक्त, होट्टलचा रहिवाशी होता. सिद्‌धगीने अर्ग राजाकडून संपत्ती घेवून कल्याणीच्या शिवमंदिराची स्थापना केली. सिद्‌धगी हा चालुक्य राजा सोमेश्वराचाही मित्र होता. होट्टलची मंदिरे बांधणारा अर्ग किंवा कर्क याला रेभैय म्हटले आहे. कारण अर्गाच्या आईचे नाव रेभैयदेवी असे होते. याचाच संस्कृत शिलालेख होट्टल येथील मंदिराच्या ठिकाणी सापडतो.

---

61. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 2001, Page No.96
62. जोशी सु.ग., मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक 1974, प्रथमावृत्ती, राधाकृष्ण रामचंद्र प्रकाशन, शिरूर ताजबंद, 1974, पृ.क्र. 18
63. Upadhya G.N., Op.cit, Page No.126

या वंशाच्या शासकानी करडखेल येथील कालामुखी शैव पंथाच्या गुरूंना अग्रहार म्हणून परिसरातील बरीच जमिन दानाच्या स्वरूपात दिलेली आहे. कालामुखी संप्रदायाबद्धल व त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्धलचा आदरभाव या वंशातील राजांना होता.[64]

## सिंध शाखा

कल्याण चालुक्य कालखंडाच्या सुरूवातीस उत्तर भारतातील सिंध प्रांतातून स्वतःला सिंध म्हणवून घेणारे सिंध प्रशासक दक्षिण भारतात आले. त्यांनी कल्याणी चालुक्य व त्यांच्या पूर्वजाकडे नोकरी स्वीकारले. पुढे स्वःपराक्रमावर सिंध वंशातील अनेक पराक्रमी पुरूष सामंत पदापर्यंत पोहोचले. काही सिंध वंशियांनी प्रांतपालापर्यंत मजल मारलेली दिसते. चालुक्यांच्या राजकीय इतिहासात इतर सांमतांप्रमाणे या वंशातील सामतांनाही महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले होते.

## बांगदगेचे सिंध

पूर्व मध्ययुगीन कर्नाटकामध्ये सिंधच्या जवळपास 10 शाखा होत्या. रांजोळा जि. बिदरच्या शिलालेखानुसार बांगदगेचे सिंध, बेलारीचे सिंध, राज्यलोआचे सिंध आणि पालियंडाचे सिंध हे मुख्य समजले जातात. या शिलालेखानुसार प्रभुवशैव हा बांगदगेच्या सिधांचा जबाबदार (प्रशासक) तर त्याचा भाऊ सत्यशैव हा पालियंडाचा प्रशासक होता व तसेच जगतशैव हा रानजेराचा प्रशासक तर बुद्धशैव हा बेल्लारीचा (नाडू) प्रांताचा प्रशासक होता.[65] बांगलकोटच्या शिलालेखीय संदर्भानुसार प्रभुशैवच्या अगोदर सिंध प्रथम हा राजा होता. तर त्याची पत्नी ही काडंब्बा वंशातील होती. या वंशातील नावामध्ये बराच फरक दिसून येतो. फक्त 'सिंध' हे त्यांचे सामान्य नाव वाटते. सिधं या नावाशिवाय इतर

---

64. होनराव गणेश, कालामुख तांत्रिक पंथ व त्यांचे शैक्षणिक योगदान, द युनिक रिसर्च ॲनालेसीस, Vol. XVII, Feb. 2012, लातूर, पृ.क्र. 154.
65. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series –VIII, Bidar District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.156

राजाच्या पदनामामध्ये बराच फरक जाणवतो.[66] गुट्टीचे (गुत्ती) चे सिंध हे मुलतः कुरूगुड्डीचे सिंध आहेत. त्याचप्रमाणे रांजेरू व बागडेचे सिंध हे सुद्दा मुलतः कुरूगुड्डीचे आहेत. येलाबुर्गीचे सिंध व बांगलकोटच्या सिंधांमध्ये समानता दिसते. या जिल्हयामध्ये बऱ्याच नोंदी सिंधांच्या बाबतीत दिसतात. सिंध वंशावळीच्या बऱ्याच नोंदी या जिल्हयात दिसून येतात. त्या नोंदी सिंध वंशावळीबद्दल माहिती सांगतात. एका कथेनुसार धरनेंद्र आपल्या पत्नीसोबत ही पृथ्वी पाहण्यासाठी आला. पृथ्वी आणि एक छोटे बेट व सिंधू नदी पाहत असताना त्याच्या पत्नीने सिंधू नदीच्या परीसरात एका मुलाला जन्म दिला. त्या मुलाचे नाव सिंधकुमार असे ठेवण्यात आले. तो सिंहासोबत राहायचा. तोच पुढे निडूडोला सिंध म्हणून प्रसिद्धीस आला आणि पुढे त्याने काडंब्बा कुटूंबातील मुलीशी विवाह केला. तिच्या पासून तीन मुले झाली त्याचा मुलगा सेव्हय (Sevya) हा गादीवर आला आणि राजुंळा येथील उपलब्ध नोंदीनुसार सेव्हय याला प्रभू सेवाय असे संबोंधले जाते.[67]

सिंधवंशीयांचे स्वतंत्र राज्य नव्हते. ते कल्याणी चालुक्यांचे सरजांमदार होते. बांगदगेचे सिंध स्वतःला 'भोगवती पुरवराधिश्वर सिद्द मार्तंडा' अशा पदव्या धारण केलेल्या होत्या. याचा अर्थ अच्छीछत्रा, तात्तकक्षा, पट्टकेचिन्हा, सुरवनछत्रा, चट्टसत्य भूषणा, विजयापारेघोषणा, व्यांध्राचना इ. पासून ब्राह्मणांचे संरक्षणकर्ते असे स्वतःला समजतात. यालाबुर्गी (यारंबारवी) येथे सिंधांची एक शाखा होती. बागदगेच्या सिधांच्या नंतर याल बुर्गीच्या सिंधांनी या प्रदेशात राज्य केले. त्याच्या राज्याच्या अस्तित्वाच्या बऱ्याच खुणा या प्रदेशात दिसतात. एक शक्तीशाली सरजांमदार म्हणून बागलकोट परिसरात या वंशाने राज्य केले. त्यांचे वंशावळ खालीलप्रमाणे आहे.

एका संदर्भानुसार असे दिसून येते की, त्यांचे राज्य हे येरंबबारीगे हे असून या प्रदेशात किसूकुडू –70, बागदागे 70, कोलावडी– 300, नरेंगल–12, कल्लूरू, बल्लरीगे, (इ.स. 1125) 1155 च्या बदामीच्या कोरीव लेख संदर्भानुसार असे वर्णन दिसून येते की, सिंध, चामुण्ड, यांची पत्नी लक्ष्मी देवी ही सुंदी, होसवूरा, कडकेरी आणि इतर प्रदेशाची

---

66. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.19

67. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series –VIII, Bidar District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.156.

शासक होती.[68] इ.स. 1163 च्या पट्टदकल शिलालेखी संदर्भानुसार सिंधांची वंशावळ सांगितली जाते व तसेच चाऊण्डाच्या पत्नीचेही वर्णन दिसते.[69] याच बरोबर चाऊण्डाचा पुत्र कुमार अच्युगी आणि पेर्मोडी हे पट्टदा, किसीवोलालचे राज्यकर्ते होते. इ.स. 1169 च्या शिलालेखीय संदर्भानुसार असे दिसते की, चांऊण्डाची दुसरी राणी श्रेयादेवी आणि तीची मुले वीर बिज्जलदेव आणि विक्रमादित्य यांनी किसुकड्डू –70, बागदादे –70 आणि केलावडी –300 इत्यादी प्रदेशावर राज्य केले. हे चालुक्यांच्या काळात होवून गेले.

1176 च्या कटगिरीच्या शिलालेखी संदर्भानुसार चाऊण्डाची मुले बिज्जला आणि विक्रमादित्यदेवाने किसिकडू–70, बगाडे–70, हंगरीगे–17, नरंगले–12, इत्यादी यरंमबारीगे राजधानीतील प्रदेशावर राज्य केले. आणखीन एका संदर्भानुसार त्याचे राज्य करविडी –30, पर्यंत होते.[70]

इ.स. 1151 च्या शिलालेखी संदर्भानुसार चांऊण्डाची आणखी एक पत्नी दमलादेवी आणि तिचे जैन धर्मावरती असलेले प्रेम दिसून येते. जामखंडी तालुक्यातील सिंधबिज्जळ व विक्रमादित्य यांचे संदर्भ दिसून येतात. इ.स. 1167 च्या आणखी एका शिलालेखी संदर्भानुसार बिट्टरसा आणि होलारसा यांचे वर्णन आढळून येते. मात्र त्याच्या शाखेविषयी सविस्तर माहिती उपलब्ध नाही.

## वज्जी वंश

महाराष्ट्रातील बऱ्याच कन्नड शिलालेखांमध्ये या वंशाचा संदर्भ आलेला दिसून येतो. ते कल्याणी चालुक्यांचे प्रमुख मांडलिक राजापैकी एक होते. कल्याणी चालुक्यांच्या राज्याच्या विस्तारात वज्जी वंशानी महत्त्वाची भूमिका निभावली. या शिलालेखांमध्ये त्यांच्या धैर्यशील कृतीचा उल्लेख आढळून येतो. कर्नाटकातील काही शिलालेखांमध्ये सुद्धा वज्जी वंशाचा संदर्भ दिसतो. काही संशोधकाच्या मते वज्जी वंश हे मुलतः कर्नाटकातील रोना प्रदेशातील असल्याचा त्यांचा कयास आहे. कल्याणचा चालुक्य राजवटी काळात वज्जी

68. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.332
69. Reddy Devarakonda, ibid, Page No.217.
70. Reddy Devarakonda, ibid, Page No.175-177.

वंशाच्या सामंतांनीही महाराष्ट्रातील नांदेड जिल्हयावर राज्य केलेले दिसून येते. इ.स. 1047 च्या तडखेल शिलालेखानुसार वज्जी वंशाची वंशावळ खालीलप्रमाणे दिसते.[71]

वज्जी वंशाच्या नागवर्माने कल्याणी चालुक्य राजा सोमेश्वर प्रथम यांच्या बाजूने युद्द जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बऱ्याच वेळा निभावली आहे. तडखेलच्या शिलालेखानुसार नागवर्माची स्तुती (युध्दातील विजयानंतर) ''दक्षिणाविजयभूजदंडा'' अशी उपाधी देवून त्याचा गौरव करण्यात आला. नागवर्माने विंध्य देशीय राजा मलराज याच्यावर आक्रमण केले व त्याला ठार मारून त्याचे राज्य हस्तगत केले आणि सेवून देश जाळून उद्दवस्त केले. वज्ज वंशावळीत उल्लेखिलेले नागवर्मा व त्याचा भाऊ माधव यांच्या प्रयत्नामुळे कल्याणी चालुक्य राज्याचा विस्तार झाला.[72]

## नोळंब वंश

हे सामंत वन्हिकुल, वज्जीकुलासारखे कल्याणी चालुक्यांचे मांडलिक शासनकर्ते होते. कल्याणी चालुक्यांच्या अगोदर बदामी चालुक्यांचे मांडलिक म्हणून त्यांनी कार्ये केलेले होते. नोळंब शासनकर्त्यांनी नोळंबवाडी (बत्तीस हजार) व किरीवाडी या कर्नाटकातील प्रदेशात राहून त्यांनी राज्यकारभार[73] केलेला असला तरी त्यांची पूर्वीची राजधानी ही 'कंपिली' ही होती ते तुंगभद्रा नदीच्या उत्तर दिशेतील प्रदेशापेक्षा दक्षिणेकडील प्रदेशावर अधिक काळ राज्य केलेले होते. गंगावती तालुक्यातील विप्र प्रदेश काही काळ त्यांच्या ताब्यात होता.[74]

दहाव्या शतकात राष्ट्रकुटाचा पराभव करून चालुक्यांनी पुन्हा राज्य निर्माण करताच या नोळंब वंशाने चालुक्यांची चाकरी स्वीकारली व त्यांच्या महत्त्वपूर्ण सामंतापैकी ते एक सामंत बनले. निपदी शिलालेखात (जिल्हा कोप्पल, कर्नाटक राज्य) पल्लव राजाचा उल्लेख आहे. हा नोळंब राजा असावा. इ.स. 989 च्या शिलालेखात परियरबसी पल्लव

---

71. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 2001, Page No.107
72. Upadhya G.N., ibid, Page No.XII
73. Cohen Andrew L, Artibus Asiae, Why a Histroy of Monuments from Nolambavadi, source 'Artibus Asie, Vol. 57, No.1/2 (1997), Page No.24
74. कळकंभ व हळ्ळेनड्डी शिलालेख, जिल्हा कोप्पल, कर्नाटक राज्य

राजाची पत्नी म्हणून ओळखली जाते. हा पल्लव राजा नोळंब दिलीप (दिलप) इरियननोळंब यांचा मुलगा असावा. कोप्पलचे इ.स. 1032 च्या शिलालेखानुसार चिन्हकब्बेपती दिलीप म्हणून तिचा मुलगा गुणी बेडंग या नावाने ओळखला जात असे.[75] कल्याणी चालुक्य राजा विक्रमादित्य चौथ्याच्या काळातील विप्र येथील शिलालेखावरून या वंशाच्या पारंपारिक उपाध्या दिसतात. [76] मरूला येथील शिलालेखीय संदर्भानुसार येरीवाबेदंगे सत्याश्रयाची मुलगी महादेवी जी नोळंब राजा घाटेंगकाकराचि पत्नी असलेली दिसते.[77] चालुक्य राजवंशातील जयसिंह चौथा याने 'नोळंब' असे पारंपारिक नाव धारण केले होते. यावरून जयसिंह व नोळंब वंश यांच्या स्नेहपूर्ण राजकीय संबंध असावेत पण संशोधकांच्या मते, जयसिंह चौथा हा दुसरा –तिसरा कोणी नसुन तो विक्रमादित्य चौथ्याचा भाऊ होता.[78] या राजवंशाबद्धल वरील काही कोरीव लेखांशिवाय फारशी माहिती उपलब्ध नाही.

## II उत्तर चालुक्यकालीन सामाजिक परिस्थिती

राष्ट्रकुट सत्तेच्या अस्तानंतर उत्तरकालीन चालुक्यांनी कुंतल प्रदेशावर आपली सत्ता प्रस्थापित केली. त्यांनी जवळजवळ दोनशे पन्नास वर्षे (इ.स. 963 ते इ.स. 1189) कर्नाटक व महाराष्ट्रात आपला अंमल प्रस्थापित केला. तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकणारी ऐतिहासिक कोरीव लेख, ताम्रपट, समकालीन साहित्य इत्यादी साधने उपयुक्त आहेत. याशिवाय चालुक्य (कल्याणी) स्थापत्य शैलीशी संबंधित मंदिर शिल्प व मूर्ती शिल्पकलेवरून सामाजिक परिस्थितीवर प्रकाश पडतो.

---

75. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – III, Koppala District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 1999, Page No.99
76. Reddy Devarakonda, ibid, Page No.313
77. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalakot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.409
78. Reddy Devarakonda, ibid, Page No.XXXIII

## तत्कालीन समाजरचना

उत्तर चालुक्य कालीन समाजव्यवस्थेवर प्राचीन पारंपारिक समाजव्यवस्थेचा प्रभाव जाणवतो. त्यानुसार समाजात जातिव्यवस्थेवर आधारित विविध वर्ग निर्माण झालेले आढळतात. कल्याणी चालुक्याच्या कोरीव लेखामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, महाजन, या वर्णातील जातींसोबतच समाजात कनिष्ठ समजला जाणारा वर्ग ज्यात शेतकरी, शेट्टी, माळी, गवंडी, चांभार, बुरूड, विणकर, खलाशी अशा कष्टकरी वर्गांचाही उल्लेख येतो. कल्याणी चालुक्यांच्या चिकुर्डे व मिरज ताम्रपटात न्हावी व धोबींचाही उल्लेख येतो.[79] तत्कालीन समाजात व्यापारी वर्गालाही महत्त्वपूर्ण स्थान होते. कल्याणी चालुक्य समकालीन शिलाहार राजाचा कोल्हापूर व मिरज कोरीव लेखात[80] वीर वणंज नावाने प्रसिद्द असलेल्या व्यापारी श्रेणीच्या कामकाजाची माहिती दिलेली आहे. कल्याणी चालुक्य राजांनी दिलेल्या काही लेखांमध्ये व्यापारी श्रेणीचा व तिने दिलेल्या देणग्यांचा उल्लेख आहे. उदा. चालुक्य राजा त्रिभुवन मल्ल व वीर सोमेश्वर देव यांच्या काळातील कोरीव लेखांमध्ये वीरवणंज या श्रेणीचा उल्लेख आहे.[81] हा ताम्रपट या श्रेणीने दिला होता. चालुक्य राजा त्रैलोक्यमल्ल याच्या आठव्या शासन वर्षीच्या व रायमुरारी सोईदेव याच्या चौथ्या शासन वर्षाच्या भाळवणी कन्नड लेखामध्ये काही लोक व व्यापारी श्रेणीने येथील गवरेश्वर मंदिराला जमिन दान दिल्याचे त्याच प्रमाणे काही करांचे दान दिल्याचे नमुद केले आहे. भाळवणी येथे मिळालेल्या शके 1096 च्या कोरीव लेखात या गावचे काही नेते, व्यापारी श्रेणींनी व त्यांच्या मुख्याधिकाऱ्याने भाळवणी येथील जैन विहाराच्या पूजेप्रित्यर्थ काही जमिन दान दिल्याचा उल्लेख आहे.[82]

कल्याणी चालुक्यकालीन विज्ञानेश्वराच्या मीताक्षरा ग्रंथातील [83] वर्णनाप्रमाणे निरनिराळया जातींचे परंतू एकाच प्रकारचे काम करून आपला निर्वाह करणारे लोक हे

---

79. तुळपुळे शं.गो, प्राचीन मराठी कोरीव लेख, प्रथम आवृत्ती, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, ऑगस्ट 1963, पृ.क्र. 340.
80. मिराशी वा.वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, प्रथमावृत्ती, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, 1974, पृ.क्र. 296–97.
81. खरे ग.ह., दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, अंक तिसरा, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, 1949, पृ.क्र. 49–57.
82. कोलते वि.भि., भारत इतिहास संशोधक मंडळ, त्रैमासिक, भारत इतिहास संशोधक मंडळ, अंक 35, पुणे, 9 ऑक्टोंबर 1972, पृ.क्र. 63, 82.
83. Kane P.V., History of Dharamshastras, Volume 02, Part 01, First Edi., Bhandarkar Oriental Research Institute, Pune, 1974, Page No. 68.

श्रेणीचे घटक असतात. मिताक्षराने श्रेणीची व्याख्या करताना पान विक्रेत्यांची श्रेणी, कुबिंद (कोष्टी, चर्मकार (जोडे बनविणारे) या सारख्या श्रेणींचा उल्लेख केला आहे. वाङ्मयीन उल्लेखांवरूनही निरनिराळया व्यवसायिकांच्या स्वतःच्या संघटना होत्या असे दिसते.

**ब्राह्मण**

उत्तर कल्याणी चालुक्य काळात समाजातील चार प्रमुख वर्णांपैकी सर्वश्रेष्ठ स्थान ब्राह्मण वर्णाना होते. या काळातील ब्राह्मण समाजाची व्यवसायाच्या आधारावर दोन गटांमध्ये विभागणी झाली होती. पहिल्या गटातील लोक आपली नियत कर्तव्ये करीत, तर दुसऱ्या गटातील लोक निरनिराळया प्रकारचे व्यवसाय करीत. त्यापैकी पहिल्या वर्गातील ब्राह्मणांना वेद, वेदांकाचे अध्ययन व धर्मविधी करण्याकरीता जमिन व ग्रामे (गावे) यांच्या देणग्या मिळत असत. कल्याणी चालुक्यांच्या एकूण शिलालेखांपैकी बहुतेक शिलालेख दान–धर्माशी संबंधित आहेत. ब्राह्मणांना दान दिल्याचा उल्लेख अशा शिलालेखांमध्ये दिसतो. दान देणाऱ्याच्या वंशावळी व्यतिरिक्त दान घेणाऱ्या विद्वान ब्राह्मणांच्या वंशावळीचा उल्लेख अशा शिलालेखामध्ये आढळतो. कल्याणी चालुक्य राजा त्रैलोक्यमल्ल याच्या शिरूर लेखात (इ.स. 1062) 12 ब्राह्मणांना चरित्र्यार्थ 150 गदयांन्न दिल्याची नोंद आहे.[84] ब्राह्मण विद्वानांना शासनाकडून अथवा ग्रामवासियाकडून दिल्या जाणाऱ्या करमुक्त गावाला 'ब्रह्मपुरी' असे म्हणतात. अशी करमुक्त अनेक गावे ब्राह्मणांना दिलेली दिसतात.

**ब्राह्मण अधिकारी वर्ग**

कल्याणी चालुक्यांच्या दरबारातील अधिकारी व प्रशासकीय वर्गांपैकी ब्राह्मण वर्गाचे अधिकार बऱ्याच प्रमाणात दिसतात. चालुक्यांचा मुख्यमंत्री 'धल्ल' हा ब्राह्मण होता.[85] त्याचप्रमाणे चालुक्य विक्रमादित्याच्या गदग लेखामध्ये ज्याचे वर्णन महाप्रधान म्हणून आलेले आहे तो सोमेश्वर भट्टोपाध्याय सर्व विद्याशाखांमध्ये पारंगत होता. इ.स. 1172 च्या सोवीदेव पाचव्याच्या शिलालेखात याचा प्रधान चिदरस दंडनायक महाप्रभू चवडक भट्ट

---

84. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalakot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.48, 49.

85. इ.स. 1070 चा तैलंब दुसरा कालीन लकुंडी कोरीव लेखात धल्ल नामक ब्राह्मण हा 'महामंत्रकशपतताधिपती' (Mahamantrackshatatatadhipati) म्हणजे मुख्यमंत्री म्हणून चालुक्य राजांचा अंतर्गत कारभार पाहत होता. Murari Krishana, The Chlukyas of Kalyani, First Edition, concept Publishing company, Delhi, 1976, Page No. 231 - 32, 234 – 35

उपाध्याय हा ब्राह्मण तुंगलगावचा प्रमुख महाजन असल्याचा उल्लेख त्याच गावातील शिलालेखात आलेला आहे.[86] परराष्ट्रीय दूत म्हणून ब्राह्मणांची निवड केली जात असे. त्याला 'महासंधिविग्राहिक' असा उल्लेख कोरीव लेखात दिसतो. परराष्ट्रीय संबंध हाताळण्याची क्षमता ब्राह्मणाकडेच असते. असा उल्लेख 'मानसोल्लास' या ग्रंथात असल्याचा उल्लेख कृष्णमुरारी करतात.[87] यावरून त्या काळामध्ये ब्राह्मण वर्गाला समाजासोबतच प्रशासनामध्येही मानाचे स्थान असल्याचे मानोर, कासारसिरसी[88] ब्राह्मण वर्णाने क्षत्रियांचेही कार्य या काळात स्वीकारलेले दिसते. कल्याणी चालुक्य राजा तैल दुसरा यांच्यानंतर येणाऱ्या राजांच्या शासनकाळात पुढे आलेला नागदेव धल्लचा पुत्र हा उत्तम सैनिक होता.[89] तसेच चालुक्य राजा आहमल्ल सोमेश्वर प्रथम याच्या दरबारी असलेला शुर योद्धा व राजनितीतंज्ञ मधुवरस हा परंपरेने सैनिक आणि राजनीतीतज्ञ असणाऱ्या मूळ ब्राह्मण घराण्यातील होता. त्याने आपल्या राजाला बरीच प्रसिद्धी मिळवून दिली.

### क्षत्रिय

कल्याणी चालुक्य काळात ब्राह्मणांप्रमाणेच क्षत्रियांनाही प्रशासनात व समाजात महत्त्वाचे स्थान होते. क्षत्रियांमध्ये विविध जातींचा समावेश होत असे. या काळात क्षत्रियांचे सूर्यवंशीय व चंद्रवंशीय असे दोन गट अस्तित्वात होते. सूर्यवंशीय क्षत्रिय आपली उत्पत्ती सूर्यापासून तर चंद्रवंशी क्षत्रिय आपली उत्पत्ती चंद्रापासून झाली असे सांगतात.[90] कल्याणी चालुक्याची उत्पत्ती सूर्यवंशीय क्षेत्रिय कुळात झाल्याचा उल्लेख तत्त्कालीन बिलहनच्या ''विक्रमांकदेवचरित'' या ग्रंथात कथेच्या माध्यमातून आलेला आहे.[91]

---

86. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalakot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.121-122
87. Murari Krishana, The Chlukyas of Kalyani, First Edition, concept Publishing company, Delhi, 1976, Page No. 230.
88. Epigraphiya Indica, 19, 28, Delhi, Page No. 62 – 65, 21.
89. Murari Krishana, op.cit, Page No. 232.
90. कल्याणी चालुक्य समकालीन शिलाहार मुम्मूणिराज, शक संवत्, 971, प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ताम्रपटात, उपासनी व दीक्षित या संज्ञा नावाबरोबर जोडलेल्या व्यक्तीच्या आहेत. आधार – मिराशी वा.वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, प्रथमावृत्ती, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, 1974, पृ.क्र. 133.
91. जोशी महादेवशास्त्री, भारतीय परिचय पुस्तक माला : 03, कर्नाटक, प्रथमावृत्ती, ज्ञानराज प्रकाशन, पुणे 1961, पृ.क्र. 18

## क्षेत्रिय व्यावसायीकांमध्ये झालेली वाढ

प्राचीन क्षेत्रिय वंशामध्ये पूर्णमध्ययुगापर्यंत अनेक जातींचा समावेश झालेला होता. या काळात क्षत्रिय व्यवसायासंबंधीची बंधने शिथील झालेली होती. कल्याणी चालुक्यांच्या अगोदर दक्षिण भारताला भेट देणारा चीनी प्रवासी हयू–एन–त्संग च्या मते त्या काळी तीन ब्राह्मण राजे राज्य करीत असल्याचा वृत्तांत तो देतो.[92] कल्याणी चालुक्यांच्या लष्करामध्ये क्षत्रियासोबतच ब्राह्मण व जैन सैनिक व अधिकारीही असल्याचा उल्लेख त्यांच्या कोरीव लेखात येतो. कल्याणी चालुक्य राजा भूलोकमल्ल (सोमेश्वर द्वितीय) याच्या कालखंडातील चालुक्यांचा मांडलिक जैन धर्मिय लक्ष्यरस बेळ्ळोळ –300, पूलिगेरे –300 या प्रदेशावर राज्य करीत असताना त्याने हुनगूंद येथील जैनधर्मिय आर्य पंडित व जैन बस्तीला 60 मत्तर जमीन करमुक्त दिल्याचा उल्लेख इ.स. 1074 च्या बागलकोट जिल्हयातील हुनगूंद कोरीव लेखात आलेला आहे.[93] स्मृती आणि धर्मशास्त्रांमध्ये इ.स.पूर्व 500 ते इ.स. 1000 या कालखंडातील ज्ञात असलेल्या जातीच्या यादीत कायस्थ जातीचा उल्लेख केलेला आहे. चालुक्य कालीन मिताक्षराने कायस्थांचा उल्लेख हिशोब ठेवणारा व कारकून असा केलेला आहे.[94] कल्याणी चालुक्य समकालीन शिलाहार राजा अपरादित्य याच्या शक संवत् 1108 च्या परळ कोरीव लेखात वालिंग पंडित याचा कायस्थ म्हणून उल्लेख आहे.[95] या शिवाय शके 1928 च्या वेळापूर येथील चालुक्यकालीन कोरीव लेखात[96] कायस्थ मलसेठीचा उल्लेख आहे.

## वैश्य

समाजातील वैश्य घटकाला प्रामुख्याने शेती, स्थानिक व्यापार, देश–विदेशी व्यापार व व्यवसाय असे. आर्थिक स्वरूपाचे कार्य करावे लागत असे. याशिवाय पशुपालनाचा व सावकारकीचा व्यवसाय या समाजाकडे होता. चालुक्य कोरीव लेखात वैश्य व्यावसायिक

---

92. Altekar A.S., Rashtrkuts & There Times, Oriental Book Agencie, Poona, 1934, Page No.168
93. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalakot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.402-403.
94. Kane P.V., History of Dharamshastras, Volume 02, Part 01, First Edi., Bhandarkar Oriental Research Institute, Pune, 1974, Page No. 75 -77.
95. मिराशी वा.शि., शिलाहार राजवंशाचा इतिहास, आणि कोरीव लेख, प्रथमावृत्ती, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, 1974, पृ.क्र. 197
96. तुळपुळे शं.गो., प्राचिन मराठी कोरीव लेख, प्रथमावृत्ती, पुणे, विद्यापीठ, पुणे, 1963, पृ.क्र. 104

शेट्टीचा उल्लेख बऱ्याच कोरीव लेखामधून येतो. बागलकोट जिल्हयातील ऐहोळे येथील शिलालेखात बेनीशेट्टी, वीरशेट्टी, कहिरशेट्टी, मरूळेशेट्टी, कपरदेचीशेट्टी, मुंडशेट्टी या व्यापाऱ्यांनी दानधर्म केल्याचा उल्लेख येतो.[97] वस्तूची खरेदी–विक्री करणारे व्यापारी आणि घाऊक व्यापारी यांना श्रेष्ठी आणि त्यांच्या संघटनेला ''नखर''[98] किंवा श्रेणी अशी संज्ञा होती. चालुक्यकालीन एकालेखात, ''वैश्य कुळात जन्मलेले आणि खरेदी–विक्रीचा व्यवसाय करून संपत्ती वाढविणारे'' असे वर्णन केले आहे.[99] प्रसिद्ध व्यापारी संस्था वीर वणंजचे ऐहोळे हे प्रमुख स्थान होते. या संस्थेचा उल्लेख कल्याणी चालुक्य[100] व शिलाहार राजाच्या कोरीव लेखात मिळतो.[101] वणंज हा शब्द वाणिक किंवा वणीज या संज्ञेपासून निघालेला दिसतो. तत्कालीन कोरीव लेखातील पुराव्यांवरून असे दिसते की, या श्रेणीच्या बाजाराच्या दिवशी आठवडी सभा होत असत. विक्रेत्यांकडून वस्तूंच्या विक्रीवर विक्रीकर गोळा केला जात असे. अशा प्रकारे वसूल केलेला कर हिंदू आणि जैन मंदिराला देणगी म्हणून दिला जात असे.[102]

## शूद्र

स्मृतीकारांनी शूद्रांना वेद अध्ययनाचा अधिकार दिलेला नव्हता. सर्व प्राचीन ग्रंथ कारांनी उच्चवर्णीयांची सेवा हा एकच व्यवसाय शुद्रांकरिता सांगितलेला होता. परंतु या कालखंडात तो कालबाहय ठरला होता. मीताक्षराच्या वर्णनाप्रमाणे देवलने शुद्रांनी द्विजातीयांची सेवा करावी असे सांगितले आहे, पण त्या बरोबर ते शेती, पशुपालन,

---

97. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalakot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.376.
98. नखर, शेट्टी व सेट्टी गुप्त या नावाने ज्ञात असलेल्या व्यापारी श्रेणींच्या हातात व्यापार होता.
99. Retti Shrinivas, The seunas, First Publication, Karnataka University, Dharwad, 1973, Page No.241-242.
100. Murari Krishna, The Chalukyas of Kalyani, (Circea 973 AB to 1200 AD) 1st Edition, Concept Publishing Company, Delhi -1977, Page No.290-91, कर्नाटकातील हिरे हडगल्ली आणि संबंधीत इतर लेख-
101. चालुक्य समकालीन शिलाहार राजा गण्डरादित्य व विजयादित्य यांचे अनुक्रमे शक संवत् 1058 चा कोल्हापूर व शक संवत् 1065 चा मिरल कोरीव लेख यामध्ये वीर वणज या व्यापारी मंडळाने अनुक्रमे कवडेगोल्ला येथील जैन बसदी व माधवेश्वर मंदिराला दिलेली दाने नमुद केली आहेत. या दोन्ही लेखांमध्ये दोन्हीही ठिकाणच्या बाजारात वसूल केलेला विक्रीकर या मंदिरांना दान दिल्याचा उल्लेख आहे. आधार – मिराशी वा.वि., शिलाहार वंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, प्रथमावृत्ती, बिदर व संशोधन मंडळ, नागपूर 1974, पृ.क्र. 300–301.
102. इ.स.1154 चा मुधोळ शिलालेख, जिल्हा कोपल. आधार – Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – III, Koppala District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 1999, Page No.185-186.

भारवाहक, वस्तूविक्री हे ही व्यवसाय करू शकतात असेही म्हटले आहे. याशिवाय चित्रे काढणे, नृत्य, संगीत तसेच वेणू, वीणा, मृदंग आणि ढोलके वगैरे वाद्य वाजविण्याच्या कलांचाही विकास करू शकतात.[103] हे सर्व उल्लेख शुद्रांनी निर्वाहासाठी करावयाच्या व्यवसायाच्या बाबतीत बरीच प्रगती केली होती असे दर्शवितात. काही शुद्रांनी सैनिकी पेशाही स्वीकारलेला होता.

## अस्पृश्यता

कल्याणी चालुक्य कालंखडात समाजात अस्पृश्यांचा एक वर्ग होता. ज्याची वसती साधारणतः गावाच्या बाहेर असे. धोबी, जोडे बनविणारे, गारूडी, चांडाळ, बुरूड इत्यादी जातींचा समावेश अस्पृश्यामध्ये होत असे. याशिवाय गारूडी, डोंबारी यांचाही समावेश या काळापर्यंत अस्पृशामध्ये झालेला होता.[104] या कालखंडाच्या अखेरीपर्यंत अस्पृश्यतेची कल्पना पराकोटीला पोहचली होती. या काळाशी संबंधित उपलब्ध कोरीव लेखांमध्ये आलेली व्ययसायदर्शक स्थलनामे या सत्याला पुष्टी देतात. उदा. कुंभारगेरे व कुंभारग्राम[105] ही अनुक्रमे बहुतेक चालुक्य वंशीय सोमदेवाच्या कोल्हापूर लेखात व राजा वर्मा यांच्या शके 1110 च्या तोरगल तांम्रपटामध्ये आलेली कुंभाराची नावे दिसतात. पंढरपूर शिलालेखामध्ये 'लोहारे' हे नाव लोहारांची वसती दर्शविते.[106] यावरून हे सिद्ध होते की, समाजातील कष्टकरी अस्पृश्य समाजाची विशिष्ट अशी वसती असे. बहुधा ती गावच्या बाहेर असे हे अस्पृश्यतेचे द्योतकच आहे.

## विवाह प्रथा व स्त्रियांची सामाजिक स्थिती

हिंदू धर्मातील विवाह विषयक रूढी प्रमाणे जातीअंतर्गत विवाह हा सर्वसाधारण नियम असला तरीही प्रतिलोम आणि अनुलोम या दोन्हीही आंतरजातीय विवाह पद्दती तत्त्कालीन समाजात प्रचलित होत्या. या कालखंडात प्राचीन पारंपारिक विवाह पद्धतीचा

---

103. Kane P.V., History of Dharamshastras, Volume 02, Part 01, First Edi., Bhandarkar Oriental Research Institute, Pune, 1974, Page No. 121 -122........या शिवाय नारद आणि याज्ञवल्क्य स्मृतींनी शुद्रांना संकट समयी क्षत्रिय व वैश्यांचे व्यवसाय करण्याची परवानगी दिलेली आहे.
104. Kane P.V., ibid, Page No 70
105. Indian Antiquire, 12, Delhi, Page No. 97
106. तुळपुळे शं.गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, प्रथमावृत्ती, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, ऑगस्ट 1963, पृ.क्र.182

स्वीकार करण्यात आलेला होता.[107] या काळात आंतरजातीय विवाह प्रचलित होत. परंतु समाजात ते विशेष प्रिय नव्हते असे दिसते. स्मृतीकारांनी अनुलोम विवाहांना कायदेशीर म्हणून मान्यता दिली होती. सोमदेवाच्या नितीवाक्यामृतामध्ये मिळणाऱ्या माहितीवरून या प्रकारचे विवाह या काळात होत असत असे दिसते.[108] स्मृतिचंद्रिका ग्रंथात सांगितलेल्या काही बंधनांसह हा विवाह प्रकार या संपूर्ण काळात अस्तित्त्वात होता असे म्हणता येईल. मीताक्षराच्या वर्णनाप्रमाणे ते त्याच्या इ.स. 1100 वेळेपर्यंत प्रचलित होते. परंतु हे विवाह त्याच्या अध्ययनाच्या काळाच्या अखेरीस अप्रिय होवू लागले.[109]

या कालखंडात मंदिरातून देवाच्या सेवेसाठी स्त्रियांना देद्वासी म्हणून ठेवण्याची प्रथा समाजात होती. बहुपत्नीविवाह, बालविवाह, वेश्याव्यवसाय, अनौरस संतती समाजात होत असे. लग्नकार्यात वधूबरोबर आंदण म्हणून दासी देण्याची प्रथा वरिष्ठ वर्गात होती. समाजातील नीम्न वर्गातील स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. स्त्रियांना दुष्ट, चंचल, अविचारी, स्त्रौण, विश्वासास अपात्र आणि परमार्थ मार्गातील धोंड समजण्यात येई. मुलीने शिक्षण घेतले तर तिला वैधव्य प्राप्त होते अशी ही समजूत होती. स्त्रियांनी पायात जोडे चपला घालणे अपवित्र गोष्ट समजली जात होती. ती वरिष्ठ वर्गाचा अपमान करणारी बाब ठरत होती.[110] एकंदर पाहता तत्कालीन समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान असलेले दिसते. जशी समाजात शुद्रांची स्थिती होती तशीच स्थिती स्त्रियांची ही असल्याचे दिसते.

## सामाजिक रीतीरिवाज

या कालखंडातील राहणीमान, खानपान, रीतीरिवाज यात तेवढासा बदल जाणवत नाही. अध्यात्मिकतेसोबतच भौतिक जीवन ही तत्कालीन समाज जगत होता. समाजातील श्रीमंत वर्ग मोठया वाड्यांमध्ये राहत असत. त्याकाळी हे स्नापक (अंघोळ घालणारी), स्वयंपाकी, प्रासधक अशा सेवकांचा उल्लेख आढळतो. सर्वसामान्याची घरे आकाराने लहान असत. अस्पृश्यांची घरे गावाबाहेर व झोपडीवजा असत. साधारणपणे तÙकालीन श्रीमंत,

---

107. Kane P.V., History of Dharamshastras, Volume 02, Part 01, First Edi., Bhandarkar Oriental Research Institute, Pune, 1974, Page No 449
108. Altekar A.S., Rashtrakuths & There Times, First Edition, Oriental Book Agencies, Poona, 1934, Page No. 336 - 337
109. Kane P.V., op.cit, Page No. 457
110. शरण आर., प्राचीन भारत का इतिहास, संस्कृती एवं पुरातत्व, प्रथम संस्करण, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली, 2002, पृ.क्र. 242. .

लोकांच्या दैनंदिन आहारात, दूध, तूप, साखर, काजू, फळे, गहू, तांदूळ, ज्वारी यांचा वापर केला जाई. तर सर्व सामान्यांना एकवेळचे जेवनही मुश्कीलीने मिळे त्यांच्या जेवणात ज्वारी, तांदळाची अंबील, ओल्या कच्च्या अन्नाचा समावेश केला जाई. समाजात मांसाहारी लोकांची ही संख्या होती. पण ही संख्या खूपच कमी दिसे विशेषतः तांत्रिक पूजेप्रसंगी प्रसाद म्हणून मांस भक्षण केला जाई. तत्कालीन प्रवासी सुलेमान लिहितात, भारतीय मद्यपान करीत नाहीत. वात्सायनाच्या कामसुत्रात श्रीमंतांचे मद्यपानांची वर्णने आढळतात. पण विशिष्ट प्रसंगी समाजातील लोक मद्यपान करीत. त्या काळात समाजात तांत्रिक पंथाचा बोलबाला होता. तांत्रिकतेच्या विधीमध्ये मांस भक्षण व मदिराभक्षण आढळतो. त्यामुळे तत्कालीन समाजात मांस व मदीरापान केले जात असावे.

दक्षिण भारतात पुरुष धोती, पंचा वापरात किंवा कमरेखाली शुभ्र वस्त्र गुंडाळीत असत. कमरेचा वरचा भाग उघडा राही. किंवा उत्तरीय वस्त्र वापरत. स्त्रिया अन्तरीय साडी सारखा प्रकार आणि उत्तरीय दुपट्टा वापरीत. समाजातील शुद्रांना लज्जरक्षणापुरतेच वस्त्र मिळे. स्त्रीपुरूषांना अलंकाराची आवड दिसते. स्त्रिया बांगडया, करधनी, हार, बाजूबंद, पैजनी वापरीत.[111] समाजातील बहुसंख्य लोकांवर धार्मिकतेचा पगडा दिसून येतो. या काळात अनेक पंथ, उपपंथाची निर्मिती झाली होती. समाजात तांत्रिकतेचा बोलबाला दिसून येतो, तांत्रिकतेच्या विधीमध्ये अघोरी तंत्र मंत्राचा वापर केला जाई.

## समाजाची राज्यकर्त्याप्रती भावना

या कालखंडात शासनकर्त्यांकडून अशी अपेक्षा व्यक्त केली जात असे की, शासन कर्त्यांनी परंपरेतून निर्माण झालेली व्यवस्था अशीच कायम ठेवली पाहिजे. शिवाय अंतर्गत व बहिर्गत शत्रूपासून संरक्षण केले पाहिजे. या मोबदल्यात एकूण उत्पन्नापैकी सहावा हिस्सा राजाला दिले जाईल. या कालखंडात सामाजिकतेची मूळे श्रृती व स्मृती ग्रंथातील आचार विषयक तत्त्वापर्यंत पोहचली होती. या ग्रंथाच्या आधारे सामाजिक नितीनियमांची जोपासना राज्यकर्त्यांकडून केली जाईल. सामाजिक रीतीरिवाजांमध्ये शासनकर्त्यांचे फारसे हस्तक्षेप होत नसे. एखाद्या विवादाच्या प्रसंगी मात्र राजा त्यात हस्तक्षेप करी. अनेक सामाजिक संघटनांच्या माध्यमातून समाजाला संघटीत करण्याचा प्रयत्न केला जाई. या

111. शरण आर., प्राचीन भारत का इतिहास, संस्कृती एवं पुरातत्व, प्रथम संस्करण, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली, 2002, पृ.क्र. 242

संस्था अथवा संघटना पारंपारिक, धार्मिक, रूढी परंपराचे पालन करून घेत. गरजेनुसार काही प्रमाणात त्यात बद्धलही करीत. काही जाती –जमातींचे त्या त्या वर्गापुरते वेगळे काही नियमही बनवली जात. सार्वजनिक समस्या दूर करण्यासाठी गाव तसेच त्यांच्यावरील अधिक अधिकार असणाऱ्या तालुका मंडळ येथील प्रादेशिक सभांशिवाय नानादेशी, मणीग्राम तसेच पंचशात, अय्याबोल या संस्था व्यापारी संस्थाच्या संघाप्रमाणे न्यायिक व प्रशासकीय दृष्टिकोनातून स्वतंत्रपणे कार्य करीत असत. त्यांच्या कार्यात राजाचा किंवा इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप नसे.[112]

## शैक्षणिक परिस्थिती

इसवी सनाच्या 10 व्या ते 12 व्या शतकातील शैक्षणिक परिस्थिती पाहता सर्वसामान्य, उपेक्षित सामाजिक वर्ग व स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आलेले होते. शैक्षणिक अधिकार समाजातील फक्त उच्च वर्णीयापुरतेच मर्यादित होते. संस्कृत शिक्षणावर समाजातील उच्च वर्णीय ब्राह्मणांचा एकाधिकार असे. यास काही तुरळक अपवादही दिसतात. या काळात संस्कृत भाषेतील शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी राजा, व्यापारी संघटना तसेच समाजातील श्रीमंत लोकांकडून मोठया प्रमाणात पैसा पुरविला जाई. या काळात शैक्षणिक विषयाची संख्या मोठया प्रमाणात दिसते. एकाच वेळी 14 ते 18 अशा विविध विषयांचा अभ्यास केला जात असे. या विषयांपैकी पुढील चार विषय अतिशय महत्त्वपूर्ण समजले जात. दर्शन (आन्विक्षिकी), वेद (त्रयी), अर्थशास्त्र (वार्ता), तथा राजनिती (दंडनीती) राजकीय दृष्टिकोनातूनही या विषयांना महत्त्व प्राप्त झालेले होते. या कालखंडात 14 विद्यांनाही महत्त्व प्राप्त झालेले होते. 04 वेद, 06 अंग, स्वरशास्त्र, छंदशास्त्र, व्याकरण, शब्दसाधन [113] ज्योतीष तसेच क्रियापद्दती, पुराणे, तर्कमीमांसा, धर्मशास्त्र असे हे चौदा विषय होते. यांना सहाय्य करणारे आयुर्वेद, धनुर्वेद, गंधर्ववेद, व अर्थशास्त्र (राजनीती) असे आठरा विषयांचाही शैक्षणिक कार्यात समावेश केला जाई. याशिवाय धर्मशास्त्र, व्याकरण, गणित, इतिहास, ज्योतीष इत्यादींचाही यात समावेश

112. नीलकंठशास्त्री के.ए., दक्षिण भारत का इतिहास, आवृत्ती नववी, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, पटणा, 2006, पृ.क्र. 175
113. विशेष कठीण शब्दाचा अभ्यास करणारा विषय

असे.[114] अशा विविध विषयांमध्ये निपूण असणाऱ्या ब्राह्मणांना राजदरबारात मानाचे पद मिळत असे. विद्वान ब्राह्मणांना अग्रहाराच्या रूपाने दानधर्म केले जाई.[115]

शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या अनेक शैक्षणिक संस्था त्या काळी अस्तित्त्वात होत्या. आग्रहार, ब्रह्मपूरी, मठाच्या माध्यमातून शिक्षण दिले जाई. सरतूर, भिरद्वगी, सलद्वगी (जिल्हा विजापूर) बीड, सलोतगी, कल्याणी, शिरूर अनंतपाळ (जि.लातूर) येथील मठ व मंदिरे[116] बेळगाव येथील ब्रह्मपूरी अथवा कांची येथील घटिका शैक्षणिक सुविधा देण्यासाठी फार प्रसिद्ध होत्या असे अनेक शैक्षणिक संस्था दक्षिण भारतात अस्तित्वात होत्या. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थाना ब्रह्मपूरी अथवा घटिका या नावाने ओळखले जात. पॉंडेचरी जवळील एका वैष्णव मठातून 14 विद्याचे शिक्षण दिले जात असल्याचा उल्लेख पॉंडेचरीच्या शिलालेखातून प्राप्त झालेला आहे. दक्षिण भारतातील कर्नाटक प्रांतातील 'नागाई' या ठिकाणच्या घटिकामधून 11 व्या शतकात वेदाचा अभ्यास करण्यासाठी 200 विद्यार्थी तर शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी 50 विद्यार्थी व यांना शिकविण्यासाठी 03 शिक्षक, भट, प्रभाकर–मीमांसा व न्याय दर्शन शिकविण्यासाठी प्रत्येकी एक–एक शिक्षक व त्यांना सहाय्य करण्यासाठी 257 कर्मचाऱ्याची व्यवस्था करण्यात आलेली होती.[117]

उत्तर चालुक्य कालखंडात वैदिक शिक्षण देण्याचे कार्य अनेक कालामुखी शैव ब्राह्मण गुरूंनी केलेले होते. त्यांना शासनकर्त्यांकडून अग्रहार मिळत असे. गणेशवाडी, करडखेल इत्यादी ठिकाणी कालामुखी शिक्षकांचे शैक्षणिक केंद्र होती. वैदिक ज्ञानासाठी इतरत्र प्रदेशातून अनेक विद्यार्थी येथे येत असे[118]

## सामाजिक करमणुकीचे साधने

या कालखंडात करमणुकीची विविध प्रकारची साधने दिसून येतात. राजपरिवारातील व्यक्तीप्रमाणे सर्वसामान्य आपापल्या परिस्थितीनुसार विविध करमणुकीच्या

114. Babras Vijaya Ganpatrao, Unpublished, Ph.D. Thesis, Position of Woman, Auring Yadava Period, (1000 A.D. to 1350 A.D. Dr.Babasaheb Ambedkar Marathawada University, Aurangabad, 1992, Page No. 185
115. नीलकंठशास्त्री के.ए., दक्षिण भारत का इतिहास, आवृत्ती नववी, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, पटणा, 2006, पृ.क्र. 350
116. Babras Vijaya Ganpatrao, op.cit Page No. 185
117. नीलकंठशास्त्री के.ए., उपरोक्त, पृ.क्र. 350
118. होनराव गणेश, कालामुख तांत्रिक पंथ व त्यांचे शैक्षणिक योगदान, दि युनिक रिसर्च अॅनॅलेसिस, Vol. XVII, Feb. 2012, लातूर, पृ.क्र.46.

साधनांचा वापर फावल्या वेळेत करीत. या काळात पारंपारिक करमणुकीच्या साधनांचा वापर केला जाई. काही करमणुकीचे साधनेही बैठया पध्दतीची तर काही मैदानी स्वरूपाची दिसतात. स्त्रियांची करमणुकीची साधनेही पुरूषी साधनापेक्षाही काहीशी वेगळी होती. इसवी सन 804 साली कांची विजयानंतर राष्ट्रकुट राजा गोविंद तिसरा याचा मुक्काम तुंगभद्रा नदीकिनारी असताना वराहाच्या शिकारीत त्यांनी भाग घेतलेला होता. गंग राजा बुटूंग दुसरा याचा शिकारी कुत्रा काली एका वराहाशी झालेल्या संघर्षात मृत्यूमुखी पावला. राजपरिवारातील लोक अशा शिकारीमध्ये सहभागी होण्यास आनंद मानत असत. राष्ट्रकुट राजा इंद्र चौथा याचा सर्वांत आवडता खेळ आधुनिक पोलोसारखा होता.

चालुक्य राजा विजयादित्याच्या काळातील गायकांबरोबर झालेल्या कराराचे नुतनीकरण चालुक्य राजा विजयादित्याच्या राणीने केले व या कराराचे पालन संपूर्ण राज्यभर व्हावे असा आदेश दिल्याची नोंद विक्रमादित्य दुसरा याच्या पट्दक्कल कोरीव लेखात आढळतो. काही गायिकांनी वीणा व मृदंग वाजविण्याच्या कलेमध्ये प्राविण्य संपादन केले होते असे होट्टल, निलंगा, धर्मापूरी, येथील मंदिरावर असलेल्या सूरसुंदरी शिल्पांमध्ये ज्या वीणावादक स्त्रिया आहेत त्यावरून दिसते.[119] याशिवाय होट्टल जिल्हा नांदेड येथे एक प्रकारचे तंतूवाद्य वाजविणारे शिल्पे आहेत.[120] ही वाद्य नृत्याच्या साथीला इतर वाद्यांबरोबर वाजवित असत. त्याचप्रमाणे स्वतंत्र्यपणेही वाजवित असत. मंदिरामध्ये नियुक्ती केलेल्या नृत्य करणाऱ्या मुलींना देवासमोर बऱ्याच वेळा नृत्य करावे लागत असे. होट्टल व धर्मापुरी[121] येथील मंदिरावर बासरीच्या सुरांच्या तालावर नृत्य करणारे काही स्त्री शिल्पे आहेत. ती कदाचित मंदिरामध्ये नृत्य करणाऱ्या मुलींचे प्रतिनिधित्त्व करीत असावेत. औंढा व निलंगा येथेही नृत्य करणारे शिल्प दिसतात.

सार्वजनिक कार्यात लोक मोठया हिरहिरीने सहभाग घेत असत. जुगार, घोडयाच्या शर्यती, कोंबडी व बकऱ्यांच्या झुंजी इत्यादी साधने सर्वसामान्यांच्या करमणुकीची होती. माकडवाले, अस्वलवाले, भारूडी इत्यादी समाजातील लोकही सर्वसामान्यांचे मनोरंजन

---

119. पाठक अ.शं. (संपा.), महाराष्ट्र राज्य, गॅझेटियर, महाराष्ट्र : इतिहास – प्राचीन काळ, खंड–1, भाग –2, स्थापत्य व कला, द्वितीय आवृत्ती, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2009, पृ. क्र. 208, 209

120. Temple Architecture & Sculpures of Maharashtra, Page No. 157, Photos No. 60.4, 61.2, 61.3

121. Temple Architecture & Sculpures of Maharashtra, ibid, Page No. 157, Photos No. 61.1, 62.4, 68.1

करीत. नृत्य, संगीत याद्वारेही समाजाचे मनोरंजन होत असे. त्या काळातील मंदिरेही धार्मिक क्षेत्राशी संबंधित तर होतीच. याशिवाय नृत्य व संगीत कलेचीही हे मोठे केंद्र होते.[122] अशी विविध साधने समाजाच्या करमणुकीची होती.

## III उत्तर चालुक्य कालीन आर्थिक परिस्थिती

इसवी सनाच्या 10 व्या ते 12 व्या शतकातील उत्तर चालुक्यकालीन आर्थिक परिस्थिती पाहता असे लक्षात येते की, आधुनिक काळाप्रमाणे याही काळात भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रमुख केंद्र हे कृषी होते. राज्यांची अर्थव्यवस्था ही कृषीवर आधारित होती. उत्तर चालुक्यांच्या राज्यातून गोदावरी, मांजरा, तुंगभ्रदा इत्यादी प्रमुख नद्या व त्यांच्या उपनद्या वाहत होत्या. या नद्याची खोरे अतिशय सुपीक होती. नदयावर धरणे बांधून त्यांचा शेतीसाठी वापर केला जात असे. यामुळे राज्याच्या कृषी उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होत असे. कृषी सोबतच व्यापार व विविध उद्योग व्यवसाय मोठया प्रमाणात चालत असे. चालुक्य राजांनी उद्योग व्यवसायाच्या वृद्धीसाठी कार्य केलेले दिसते. उत्तर चालुक्य कालीन अर्थव्यवस्थेची मंदिराची भूमिका ही महत्वपूर्ण वाटते. या सर्व घटकांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे,

### कृषी अर्थव्यवस्था

इ.स. 10 व्या ते 12 व्या शतकात आजच्या प्रमाणे बहुसंख्य जनता ग्रामीण भागात वास्तव्यास होती. कृषी ही त्यांच्या अर्थव्यवस्थेचे प्रमुख घटक होते. त्या काळी शेतीचा मालक होणे म्हणजे समाजात प्रतिष्ठा मिळविल्यासारखे शेतकऱ्यांना वाटत असे. कोणत्याही जातीतील किंवा व्यवसायातील लोकांना शेतीचा मालक होणे पसंत पडत असे. त्यासाठी ते सतत प्रयत्नशील असत, ग्रामीण भागात कृषी अर्थव्यवस्थेवर आधारीत विविध उद्योग व्यवसाय चालत असत. शेतकऱ्याप्रमाणे शेतमजूरांचा उदरनिर्वाह ही शेतीवरच चालत असे.

122. नीलकंठशास्त्री के.ए., दक्षिण भारत का इतिहास, आवृत्ती नववी, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, पटणा, 2006, पृ.क्र. 355

मंदिरे आणि मठांना दानाच्या स्वरूपात मिळालेली शेती कसण्यासाठी शेतमजुराची आवश्यकता पडत असे. यामुळे शेतमजुरांना मागणी अधिक असे.[123]

## भूस्वामीत्त्व

तत्कालीन दक्षिण भारतात व्यक्तिगत जमीन मालकाचा प्रभाव वाढत होता. भू–स्वामित्त्वाच्या दृष्टिकोनातून भू–व्यवस्थेचे चार भागात विभाजन करण्यात आले होते. पहिल्या श्रेणीच्या जमिनीच्या मोठया भागावर राज्याची मालकी हक्क असे. राज्याच्या मालकीच्या जमिनीला ''प्रभूमान्यम'' असे म्हटले जात. या जमिनीत खंडाने कसण्यासाठी देणाऱ्या जमिनीच्या वर काही कारणामुळे शासनाने शेतकऱ्याकडून जप्त केलेल्या जमिनीचांही समावेश होता. शेतकऱ्यांशिवाय या कालखंडात न्हावी, सोनार, गावूंड, खलाशी धोबी, माळी, देद्वासी, या सारख्या व्यक्तीही जमिनीच्या मालक होत्या. अशा कल्याणीच्या चालुक्य वंशीय राजांच्या चिकुर्डे, मरमुरी व निरज[124] या कोरीव लेखातील उल्लेखावरून दिसते. हे लोक स्वतः जमीन कसत असावेत. काही लेखांमध्ये आलेले 'लोकन्हावी' या संज्ञा यासारख्या शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्त्व करीत असाव्यात.[125] ज्या जमिनी शेतकरी आपली साधने देवून दुसऱ्याकडून कसून घेत असे त्या जमिनींना कामतभूमी[126] म्हणतात. तर ज्या जमिनीची मशागत कुळांकडून केली जात असे त्या जमिनींना वहीवाट अशी संज्ञा असे. या जमिनदारांचा दर्जा कोरीव लेखात उल्लेखिलेल्या जमिनीचे मालक असणारे ब्राह्मण व जमिनी बाळगणाऱ्या धार्मिक संस्था यांच्या प्रमाणे असावा. शेतीवरील अधिकारांचे हस्तांतरण (Transfer) गावातील समाजाच्या किंवा गावातील महाजनांच्या पुर्व संमती खेरीज होत नसे. [127] चालुक्य समकालीन विज्ञानेश्वरांनीही 'दायभाग' या भागाच्या प्रस्तावनेमध्ये जमिनीवरील प्रभुत्त्वाच्या हस्तांतरणासाठी गावातील समाज आणि जातींची संमती आवश्यक आहे असे सांगणारे काही मूळ उल्लेख केलेला आहे. अशी परवानगी फक्त व्यवहाराच्या

---

123. वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत खंड 1, द्वितीय संस्करण, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, 97, पृ.क्र. 36
124. चालुक्य वंशाच्या चिकुर्डे मुरमुरी व मिरज या तीनही लेखांमध्ये मालिकीची जमिन असणाऱ्यांची नावे दिली आहेत.(हे तीनही लेख बहुधा शके 1076 चे असावेत) त्यामध्ये भावक, न्हावी, सोनार, तारवा, परीट, माळी अशी नावे मिळतात – एपिग्राफिया ऑफ इंडिका, दिल्ली,
125. पंढरपूर शिलालेख– तुळपुळे शं.गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, प्रथमावृत्ती, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, ऑगस्ट 1963, पृ.क्र. 181
126. तुळपुळे शं.गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, प्रथमावृत्ती, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, ऑगस्ट 1963, पृ.क्र. 113, 123
127. तुळपुळे शं.गो, उक्त, पृ.क्र. 96, 97

प्रसिद्धीसाठी आवश्यक आहे असेही तो म्हणतो. परंतू अशी परवानगी घेतलेली नसेल तर केलेला व्यवहार रद्द होईल असे नाही, असेही त्यांने विधान केलेले आहे. कधीकधी शासनकर्ते मंदिर अथवा ब्राह्मणांना जमिनीचे दान देण्यासाठी खाजगी लोकांकडून जमिनी विकत घेत असत. जमिनी दानाची विविध कारणे दिसतात. दक्षिण भारतात मंदिर संस्थाना मोठया प्रमाणात शासनकर्त्याकडून जमिनी दानाच्या स्वरूपात दिली जात. याशिवाय विद्वान ब्राह्मण, सामाजिक संस्था तसेच शैक्षणिक कार्य करणाऱ्या संस्थानाही जमिनी दानाच्या रूपात दिली जात.[128] या वंशातील दुसरी श्रेणी म्हणजे ज्यात वैयक्तिक जमिनी मालकांचा समावेश होतो. या जमिनीला ''सामान्य शेतकऱ्यांची जमीन'' या नावाने ओळखले जात. अशा जमिनीमधून शेतसारा वसूल केला जाई. शेतसारा ठरविण्याचा अधिकार शेतसारा वसुलीच्या अधिकाराकडे सोपविण्यात आलेला होता. या प्रकारात कधी कधी अग्रहाराच्या रूपाने देण्यात आलेल्या मठमंदिरांना कृषीकर द्यावा लागे. तिसऱ्या श्रेणीचा जमीन मालक होता. विशेष राज्यसेवांच्या बदल्यात त्याला शासकाकडून जमिन दिले जाई. उदा. राज्यकर्मचाऱ्यांना नगदी पगाराच्या ऐवजी जमिनीचा तुकडा दिला जाई. चौथ्या प्रकाराची श्रेणी ही स्थानिक सार्वजनिक स्वरूपाची होती. गावातील लोक एकत्रितपणे गावाच्या मालकीची शेती कसत असत. त्या जमिनीवर व मिळणाऱ्या उत्पन्नावर सर्वाचा समान हक्क असे.[129]

उत्तर चालुक्य कालखंडात धार्मिक संस्थांना दिलेल्या दानाशी संबंधित अनेक शिलालेख व ताम्रपट दिसून येतात. धार्मिक संस्थाना दिले गेलेल्या भूमींना देद्वान, देवाग्रहार, देवभोग इत्यादी नावाने ओळखले जात. ब्राह्मणांना दिल्या गेलेल्या जमिनींना ब्रह्मदेह या नावाने ओळखले जातं. ज्या ब्राह्मणांना वैयक्तिक कारणासाठी जमिनी दान दिले जात त्या जमिनीवर त्याची वैयक्तिक मालकी असे. त्या जमिनीला ''एकभोग्य'' या नावाने ओळखले जाई. याशिवाय दोन व त्यापेक्षा अधिक ब्राह्मणांना दिलेल्या जमिनीला गणभोग्य जमिनी म्हटले जाई. 10 व्या शतकाच्या नंतर समाजात ब्राह्मणांच्या प्रतिष्ठेत

---

128. Nayak H.M., Gopal B.R., South Indian Studies, First Published, Geeta Book House, Mysores, 1990, Page No.300
129. वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत खंड 1, द्वितीय संस्करण, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, 97, पृ.क्र. 98

मोठया प्रमाणात वाढ झाली. शिवाय मंदिराच्या संख्येतही वाढ झाली. यामुळे जास्तीत जास्त पुण्याच्या भावनेतून अधिकाधिक जमिनीचे दान करण्याची पद्धत लोकप्रिय बनली.

## भू–मापन व भू–कर प्रणाली

भूमीचे मापन करण्यासाठी निवर्तन व मत्तरू (मत्तर) अशी दोन प्रमुख मापे अस्तित्त्वात होती. परंतु प्राचीन विद्वानांनी या मापांची व्याख्या वेगवेगळी केलेली आहे. उदा. कौटिल्य निवर्तन 900 चौ. दंडाचे मानतो, तर भास्कराचार्याच्या लिलावतीमध्ये ते 400 चौ.दंडाचे सांगितले आहे. शुक्रनीतीसार या ग्रंथामध्ये ते 625 चौ.दंडाचे दिसते.[130] कलचुरी नृपती शंकरगण यांच्या आभोणे ताम्रपटात[131] उल्लेखिलेले निवर्तन 1600 चौ.दंडाचे असावे असे मिराशींचे मत आहे. निवर्तनाप्रमाणे 'मत्तरू' या परिमाणाची अचूक व्याख्या करणे कठीण आहे. हिट्टलने मंतरू हे भू–परिमाण आहे असे सांगितले आहे. आळतेकरांनीही मंतरू भूमितून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या आधारे या परिमाणाची व्याख्या केलेली आहे. तीलगुंड लेखामध्ये एका मत्तरूतून दोन खंडूग उत्पन्न मिळते असे सांगितले आहे. दोन खंडूग म्हणजे 40 मण. आळतेकरांच्या म्हणण्याप्रमाणे दक्षिण भारतात प्रत्येक एकरी निव्वळ उत्पन्न 6 ते 12 मण होते. दर मत्तरू निव्वळ उत्पन्न 40 मणांपेक्षा अधिक आहे म्हणून आळतेकर 'एक मत्तरू' म्हणजे एकर अशी मत्तरूची व्याख्या करतात.[132] कलचुरी राजांच्या शके 1086 च्या तेर येथील कोरीव लेखात सेलूरी दंडाचा उल्लेख आहे.[133] वरील भू–मापनाशिवाय (हस्त) या मापाचा उल्लेख चालुक्यांच्या चिकुर्डे व मिरज (कल्याणी चालुक्य राजा सत्याश्रय) ताम्रपटात आलेला आहे. या लेखानुसार दान दिलेली जमीन गृहहस्ताने मोजून दिलेली होती. तुळपूळे यांच्या मते गृह या संज्ञेचा अर्थ या ठिकाणी चौरस (Square) असा आहे. चालुक्य राजा त्रैलोक्यमल आणि रायमुरारी सोईदेव यांच्या

---

130. Varma O.P., The Yadavas and There Times, Nagpur, 1970, Page No. 282
131. Mirashi V.V., Literary & Historical Studies in Indology, 1st Edition, Motilal Banarashi Das, Delhi, 1981, Page No.40-43
132. Altekar A.S., Rashtrakuths & There Times, First Edition, Oriental Book Agencies, Poona, 1934, Page No. 395 - 396
133. तुळपुळे शं.गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, प्रथमावृत्ती, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे, ऑगस्ट 1963, पृ.क्र. 35, 67

भाळवणी कन्नड कोरीव लेखात[134] दोनशे कम्म जमीन भाळवणी येथील मंदिराला दान दिल्याची नोंद आहे.

जमिनदार ब्राह्मण किंवा धार्मिक संस्था स्वतः शेती कसत नसत. ते बटाईने शेती कसण्यासाठी देत. शेतीतील एकूण उत्पन्नापैकी काही हिस्सा प्रत्यक्ष शेती कसणाऱ्यास दिला जाई. नवीन आणि जुन्या पांरपारिक शेतीत जमीन मालकाचा व शेती कसणाऱ्याचा हिस्सा प्रत्येक वर्षी वेगवेगळया स्वरूपात दिसे. प्रत्यक्षात शेती कसणारा, जमीन मालकाला, नवीन प्रकारच्या जमिनीतून पहिल्या वर्षी 1/10, दुसऱ्या वर्षी 1/8 आणि तिसऱ्या वर्षी 1/7 या प्रमाणात उत्पन्न दिले जाई. शासनाकडून मिळालेल्या जमीनीला विकण्याचा अथवा अदलाबदल करण्याचा हक्क किंवा अधिकार त्या जमीन मालकाला मिळत नसे. एकंदर पाहता ब्रह्मदेय व आग्रहार यामुळे संस्कृतनिष्ठ संकृतीचा प्रारंभ झाला. कर्मशास्त्राने घालून दिलेल्या सामाजिक संघटनांच्या मानकांचा त्यात समावेश केलेला होता. ब्रह्मदेय व आग्रहार यांच्या एकात्मिक करणामुळे प्रचलित कृषीसमुदाय नव्या सुधारणाकडे वळला. नवे जमीन मालक आणि शेतकरी यांच्यामध्ये तडजोडीसाठी बोलणी होणे आवश्यक होते. नव्या जमीन मालकांना राजसत्तेचा पाठिंबा होता. अनेकदा त्यांच्याकडे शेती व्यवस्थापनाचे आणि इतर तंत्रशास्त्राचे प्रगत ज्ञान असे. त्यामुळे त्या जमिनीवर शेती करणारे शेतकऱ्यावर तसेच नुकतेच ज्यांना शेतकऱ्याचा दर्जा मिळाला आहे अशा लोकांवर जमीन मालकांचा प्रभाव दिसतो.[135]

## जलसिंचन व्यवस्था

दक्षिण भारतात नैसर्गिक जलसिंचनाच्या अभावामुळे कृत्रिम पद्तीने जलसिंचनाची व्यवस्था निर्माण करणे आवश्यक होते. तत्कालीक ऐतिहासिक साधनाद्वारे हे समजते की, त्या काळी जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देणे हे पुण्यकर्म समजले जाई.[136]

ज्या ठिकाणी नद्या उपलब्ध आहेत त्या ठिकाणी मोठी धरणे बांधून कालव्यासाठी शेतीसाठी पाणी पुरवठा केला जाई. मात्र जेथे अशी साधने उपलब्ध नाहीत. तेथे मात्र

---

134. कोलते वि.भी., त्रैमासिक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, ऑक्टोंबर 1972, वर्षे नववे, पृ.क्र. 35, 63

135. रोमिला थापर, दी पेग्वीन हिस्टी ऑफ अर्लि इंडिया, प्रथम संस्कृरण, के सागर, पुणे, 2002, पृ.क्र. 432

136. वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत, खंड 1, द्वितीय आवृत्ती, हिंदी माध्यम कार्यान्वय, निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, 1985, पृ.क्र. 99

प्राकृतिक रचनेचा अभ्यास करून तलावांची निर्मिती करण्यात आली. शासनकर्त्यांकडून शेतीच्या विकासासाठी जलसिंचनाच्या व्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जात.[137] जलसिंचनाच्या तलाव व नदीवरील बांध या साधनांच्या निर्मितीमध्ये शासक वर्गासोबतच मंदिर संस्थेचेही फार मोठे योगदान आहे. तलावाच्या देखरेखीचे काम प्रामुख्याने ग्रामसभाकडे सोपविण्यात आले होते. तलावाच्या निर्मितीसाठी केल्या जाणाऱ्या दानाप्रमाणेच तलावाच्या दुरूस्तीसाठीच दान दिले जाई. ग्रामीण शेतकरी जलसिंचनाच्या मोबदल्यात विशिष्ट असा कर शासनकर्त्याकडे जमा करीत. सामूहिक व व्यक्तिगत प्रयत्नामुळे जलसिंचनाची व्यवस्था केले जाई. कृषी जलसिंचनासाठी विहिरीच्या पाण्याचाही वापर केला जाई. पाणी वर काढण्यासाठी विविध प्राण्यांचा वापर केला जाई. पाणी काढण्यासाठी राहटा सारख्या यंत्राचा वापर केला जाई. त्यांना कोईलु (Koylu), कल (Kaḷ), ओक्कना (Okkana), तुरू (Ture) इत्यादी नावाने ओळखले जाई.[138]

महाराष्ट्र व कर्नाटकात शेतीसाठी तलावांचा वापर झालेला बराच कोरीव लेखात आढळतो.[139] (तंडाग) अनेक गावांची नावे 'तड' अथवा 'ताड' या शब्दांच्या सुरूवातीपासून बनलेली दिसतात. चालुक्य राजा सोमेश्वर प्रथम व सोमेश्वर द्वितीय यांच्या अनुक्रमे शके 969 व 993 च्या ताडखेड/ तडखेल येथील कोरीव लेखातील तडकल्ल व तडगुरा ही स्थलनामेही वरील प्रमाणे तलावाशी संबंधित असणाऱ्या गावांशी आहेत.[140] तळावलीपल्लिकाचा[141] उल्लेख चालुक्य समकालीन शिलाहार राजा अरिकेसरीच्या ठाणे ताम्रपटात आहे. केरेयेलीचा (Kereyeli) उल्लेख चालुक्य वंशाच्या इ.स. 1134 च्या येरगी ताम्रपटात मिळतो.[142] 'केरे' म्हणजे किट्टलने दिल्याप्रमाणे 'तलाव' असा अर्थ होतो. या स्थंलाच्या सध्याच्या गावाशी केलेल्या तादात्म्यावरून पुणे, नांदेड, लातूर, कोल्हापूर आणि

---

137. नीलकंठशास्त्री के.ए., दक्षिण भारत का इतिहास, आवृत्ती नववी, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, पटणा, 2006, पृ.क्र. 357
138. Nayak H.M., Gopal B.R., South Inidan, Studies, 1st Published, Geetha Books House, Mysore, 1990, Page No. 302
139. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.43, 44, 45
140. Savdar Rajan K.V., Indian Archolover Heritez : Ariv, Hillsetation Volume, Delhi, 1991, Page No. 10.
141. मिराशी वा.वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, प्रथम आवृत्ती, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, 1974, पृ.क्र. 250
142. Ritti Shrinivas, G.C. Shelke, Inscritptions from Nanded District, 1st Edition, Yashwant Mahavidyalaya, Nanded, 1968, Page No. 31

ठाणे जिल्हयात अनेक तलाव दिसतात. यापैकी बरेच तलाव दगडांनी बांधून काढले असावेत असे तडकल्ल या नावावरून वाटते. शेतीसाठी विहिरींचाही वापर या कालखंडात केला जात होता. विहीर खोदण्यापूर्वी शेतीजमिनीच्या मालकाची परवानगी घेणे आवश्यक होते असे मीताक्षरामध्ये[143] या कालखंडात दक्षिणेत पाणी पुरवठयाचे साधन म्हणून तलाव, विहिरी सोबतच कालव्यांचाही वापर करण्यात आलेला होता. कर्नाटकातील कोप्पल जिल्हयातील कल्याणी चालुक्य राजा त्रिभूवन विक्रमादित्य सहाव्याच्या कालखंडातील (इ.स.1088) हुलगी शिलालेखात [144] कामकाय गोत्राचा नारायणभट्टोपाध्यायांचा मुलगा चौद्विभट्ट याने दुगंभद्रा नदीपासून एक कालवा हुलीगे (आधुनिक हुलगी) गावापर्यंत खोदलेला होता. या कालव्यातील पाण्याचा उपयोग पिण्यासोबतच शेतीसाठीही करण्यात आलेला होता.

## कृषी उत्पादन

दक्षिण भारतातील वातावरण उष्ण स्वरूपाचे असल्यामुळे अशा वातावरणात उत्पादीत होणाऱ्या विविध शेतीमालाचे उत्पादन घेतले जाई. तांदूळ, जवस, ज्वारी, बाजरी आणि गव्हाचे उत्पादन संपूर्ण दक्षिण भारतात घेतली जाई. पानाच्या (नागिली) मळयातून पानाचे उत्पादन वर्षातून दोन ते तीन वेळा घेतली जाई. उत्पादनाच्या दृष्टिकोनातून पानाची शेती फायदेशीर ठरत असे. वरील उत्पादनांव्यतिरिक्त विविध कडधान्य, तीळ, ऊस इत्यादी ठिकाणचे उत्पादन घेतले जाई. पश्चिम समुद्र किनारी प्रदेशात दालचिनी आद्रक इलायची आणि सुपारीची शेती केली जाई. दख्खनच्या पठारी भागावर कापूस, कोरोमंडल क्षेत्रात चंदन, क्विलोमध्ये निळीचे उत्पादन घेतले जाई. जलसिंचनाच्या सुविधा असणाऱ्या दुवाबातील सुपीक क्षेत्रात बागायती शेती केली जात असे.[145] धान्यामध्ये तांदूळ हे फारच लोकप्रिय धान्य होते असे दिसते. या काळात गावच्या हिशोबनीस, सुतार, मजूर इत्यादींचे

143. Varma O.P., The Yadavas & There Times, 1st Edition, Nagpur, 1970, Page No.272, 273
144. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – III, Koppala District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 1999, Page No.145-149
145. वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत, खंड 1, द्वितीय आवृत्ती, हिंदी माध्यम कार्यान्वय, निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, 1985, पृ.क्र. 99

पगार तांदळाच्या रूपात देत.[146] मानसोल्लास परत[147] या ग्रंथामध्ये राजाच्या भोजनाच्या यादीत केलेल्या आठ प्रकारच्या तांदळाचा उल्लेख येतो. कश्यपने[148] दिलेल्या वर्णनाप्रमाणे तांदळाचे रोपे आदि लहान–लहान वाफ्यामध्ये लावून नंतर त्यांची शेतामध्ये लावणी करीत. तत्त्कालीन कोरीव लेखामध्ये पिकांचा उल्लेख फक्त करांच्या आणि दानांच्या संदर्भातच केलेला आहे. परंतु कोरीव लेखांमध्ये आलेल्या मूग, हरभरा, तूर इत्यादी धान्यांची नावे असलेल्य स्थलांच्या उल्लेखावरून या काळातील पिकांची माहिती मिळते.

## बागायती उत्पादन

कृषी उत्पादनाला या काळात बागायती उत्पादनाची जोड देण्यात येई. या काळामध्ये लहान–लहान मळे व विशिष्ट प्रकारच्या झाडांच्या लागवडी केलेले मोठे मोठे मळे किंवा उपवनेही अस्तित्त्वात होती. कोरीव लेखांमध्ये यांचा उल्लेख बाग, वाट, वाटक, वाटिका, वाडी, वाडे, कुळागर इत्यादी संज्ञाने केलेला आहे. या भागांमध्ये बागायती शेतीमध्ये वेगवेगळया प्रकारची फळे, भाजीपाला, बऱ्याच मोठया प्रमाणावर होत असल्या पाहिजेत. याशिवाय काळी स्थळे, फणस, आंबे, द्राक्षे, आवळे, कवठ, बोरे, जांभळे, अंजीर या सारख्या फळासाठीही प्रसिद्द होती. समुद्र किनारी भागात उत्पादन घेतले जाई.[149] भेंडी, कारली या फळभाज्याशिवाय बागायती क्षेत्रात कांदे, लसून, वाली यांचेही उत्पादन घेतले जाई.[150]

## उद्योग व व्यवसाय

चालुक्य कालखंडात इतर कालखंडापेक्षा शांततामय युग असल्यामुळे लहान मोठया उद्योगामुळे विकास झाला. बहुतेक उद्योग ग्रामीण भागांशी संबंधित असल्यामुळे राजकीय अस्थिरतेचा त्यांच्यावरती फारसा परिणाम होत नसे. या कालखंडात कृषीवर आधारित विविध उद्योग व धातू उद्योगामध्ये भरभराट झाली होती.

---

146. Altekar S., Rashtrakuths & There Times, First Edition, Oriental Book Agencies, Poona, 1934, Page No. 395 – 396.
147. Randhava M.S., History of Agriculture in India, New Delhi, 1980, Page No. 228 -232
148. Randhava M.S., ibid, Page No. 484
149. Cultural Histroy of Maharashtra & Goa from Place Names in Inscriptions, Page No. 228 -232
150. Sagau E.C., Al Barunes, India, Part I, Landon, 1914, Page No. 85

## कृषी उद्योग

या कालखंडातील राज्याचा मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे कृषीशी संबंधित विविध ऊ़द्योग व्यवसाय चालू होते. गळीत धान्यापासून तेल काढण्याचा उद्योग भरभराटीस आलेला होता. या व्यवसायाची मक्तेदारी तेली समाजाकडे होती. ग्रामीण भागात घाण्याच्या साहयाने तेलाचे उत्पादन केले जाई. यासाठी बैल व इतर प्राण्यांची मदत घेतली जाई. याशिवाय कैगान व मैतुगान या प्रकारच्या धान्याचा वापर केला जात असे.[151]

पूर्व व पश्चिम समुद्र किनारी प्रदेशात ज्या ठिकाणी नारळाचे उत्पादन घेतले जाई तेथे नारळापासून तेल काढले जाई. अशा तेलाचा उपयोग खाण्यासठी, औषधीसाठी, विविध वस्तू बनविण्यासाठी, रंग म्हणूनही वापर केला जाई. उत्तर भारतात या तेलाची निर्यात केली जात असे.[152]

## गुळ उद्योग

कल्याणी चालुक्य वंशीय राजांच्या शके 969 व शके 988 च्या अनुक्रमे तडखेल व एकलारा[153] लेखांमध्ये आणि इ.स. 1079 व 1130 च्या करडखेड[154] लेखांमध्ये उल्लेखिलेले सक्क्रगे 80, 84, 60 हे गाव साखर उद्योगाच्या अस्तित्वाचा निर्देश करते. यापैकी पहिले दोन लेख राजा सोमेश्वर प्रथमचे असून तिसरा लेख महामंडळेश्वर कर्करस व चौथा लेख सोमेश्वर तृतीयचा आहे. यावरून हे स्थळ गुळ अथवा साखरेच्या उत्पादनाचे अथवा विक्रीचे मोठे स्थळ असावे. या परिसरात गुळाचे व साखरेचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असावेत.

तेल उद्योगाशिवाय साखर उद्योग हे भरभराटीस आलेला होता. नारळाच्या झाडाचा उपयोग तेलाशिवाय दोरखंड, चटई, पंखे इत्यादी वस्तू निर्मितीसाठी केला जाई.

---

151. वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत, खंड 1, द्वितीय आवृत्ती, हिंदी माध्यम कार्यान्वय, निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, 1985, पृ.क्र. 101.
152. Nayak H.M., Gopal B.R., South Inidan, Studies, 1st Published, Geetha Books House, Mysore, 90, Page No. 304
153. Ritti Shrinivas, Shelke G.C., Inscritptions from Nanded District, 1st Edition, Yashwant Mahavidyalaya, Nanded, 1968, Page No. 116, 129
154. Ritti Shrinivas, Shelke G.C., ibid, Page No. 122

## कापड उद्योग

दक्षिण भारतातील कापड उद्योग संपूर्ण भारतात प्रसिद्ध होता. दख्खनचा पठार कापूस उत्पादनात देशात अग्रेसर होता. पूर्व व पश्चिम किनारपट्टी कापड उ़द्योगात अग्रेसर होते. गोवा आणि परिसरात या कालखंडात कापड उद्योग केंद्रीत झालेले होते.[155] चालुक्य राजा सोमेश्वरच्या शके 1881 च्या रानवड कोरीव लेखात पडीवसे हे स्थलनाम कापड उद्योगाशी संबंधित असावेत.[156] इतर उद्योगांपेक्षा कापड उद्योगाची अधिक भरभराट झाली होती. चीनी संदर्भानुसार दक्षिण भारतात तयार झालेले मऊ सुती वस्त्रे ज्यावर रंगकाम केलेले आहे. हे वस्त्र वापरणे म्हणजे श्रीमंतीचे प्रतिक समजले जाई. सुती वस्त्राचे केंद्र कालिकत्त्व आणि मदुराई हे होते. कोईबतुर येथे रेशमी वेल बुट्टेदार कापड विनले जाई. चिनी माहुआनच्या मते हे वस्त्र अतिशय आकर्षक व मूल्यवान होते. असे कापड चार ते पाच फुट रूंद व बारा ते तेरा फुट लांब असणारा रेशमी तुकडा 100 सूवर्ण मोहरांच्या बरोबरीचे होते. दक्षिण भारतातील कांचीपूरम् हे ही कापड उद्योगाचे फार मोठे केंद्र होते. या शहरातील विणकर 4 यार्डाच्या पट्टात एकत्र राहत. केळीच्या धाग्यापासून कपडे विणले जात. त्याकाळातील निर्यातीत मालामध्ये सर्वाधिक निर्यात कपडयाची केली जाई.[157] कापड उद्योगाशी संबंधित कपडयांवर नक्षीकाम करणारा एक उद्योग कापड उद्योगाप्रमाणे या काळी भरभराटीस आलेला होता. विनलेल्या कपडयांना आकर्षक बनविण्यासाठी नैसर्गिक रंगाचा वापर केला जाई. या रंगाच्या माध्यमातून भुमितीय, वेल बुटीय, प्राणी पक्षी यांची चित्रे व आकृती कपडयावर काढली जात. अशा कपडयांना मागणी मोठया प्रमाणात असल्यामुळे हाही उद्योग कापड उद्योगाप्रमाणे प्रगतशील बनलेला होता.[158]

## हस्त उद्योग

या कालखंडात कुंभार कलेचा विकास चांगलाच झालेला होता. भाजलेल्या मातीपासून अतिशय सुंदर व आकर्षक वस्तू उपकरणे, भांडी यांची अवशेष सापडलेली

---

155. Nayak H.M., Gopal B.R., South Inidan, Studies, 1st Published, Geetha Books House, Mysore, 90, Page No.303.
156. मिराशी वा.वी., शिलहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख प्रथमावृत्ती, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, 1974, पृ.क्र.210
157. वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत, खंड 1, द्वितीय आवृत्ती, हिंदी माध्यम कार्यान्वय, निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, 1985, पृ.क्र. 100
158. Nayak H.M., Gopal B.R.,op.cit, Page No. 303

आहेत. दैनंदिन गरजेच्या वस्तू मातीपासून बनविल्या जात. गृहसुशोभित करण्यासाठी हस्तउ़द्योगातील उत्पादनाचा वापर केला जाई. काष्ट शिल्पाचा वापर श्रीमंत लोक करीत.

## मीठ उद्योग

पूर्व व पश्चिम समुद्र किनाऱ्यांवर मीठ नैसर्गिक पद्तीने तयार केले जाई. समुद्रातील पाण्यापासून मीठ बनविण्याच्या उद्योगावर शासनाचे नियंत्रण होते. मीठ उत्पादनावर केंद्रीय व स्थानिक असा वेगळा कर लावला जाई. दक्षिण भारतातील कन्याकुमारी, गुंटूर, दक्षिण आर्काट, वरीयुर आणि आयतुरे ही मीठ उद्योगाची केंद्रे येथून मीठाची निर्यात केली जाई.[159] कल्याणी चालुक्य समकालीन शिलहार राजा अपराजित याच्या शके 919 च्या भादान[160] ताम्रपटामध्ये आलेल्या लवणेतट व याच वंशाचा दुसरा राजा मल्लिकार्जुन याच्या शके 1083 च्या वसई[161] ताम्रपटामध्ये वर्णिलेल्या लोनवाटका या स्थलनामावरून दिसते. या दोन्हीही गावांचे तादात्म्य ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यात असलेल्या लोणाड या गावाशी केलेले आहे. या ठिकाणी चालू असलेल्या मीठ उद्योगामुळे येथील देवाला लोणदित्य हे नाव पडले असावे. काही ठिकाणी जमीन खोदून मीठ (शिंदीलोन) तयार करीत असत. कलचुरी राजा संकमदेव व यादव राजा भिल्लम यांच्या शके 1093 च्या गाडगीहाळ लेखामध्ये लोणार[162] या गावी बहुतेक अशा पध्दतीने मीठ काढत असावेत.

## धातू उद्योग

म्हैसूर पासून ते आंध्रप्रदेशापर्यंतचा भाग हा नैसर्गिक खनिजसंपत्तीने समृद्ध असणारा प्रदेश होता. हुनगुंद, होन्नाली, धारवाड, कोलार या चालुक्याच्या नियंत्रणाखाली खाणी होत्या. यातून सोने, लोखंड, तांबे इत्यादी धातूचे उत्पादन घेतले जात असे.

---

159. वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत, खंड 1, द्वितीय आवृत्ती, हिंदी माध्यम कार्यान्वय, निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, 1985, पृ.क्र. 101
160. भादान लेखामध्ये लवणेतट येथील लोणादित्याला दान दिल्याचा उल्लेख आहे. संदर्भ – मिराशी वा.वी., शिलहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख प्रथमावृत्ती, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, 1974, पृ.क्र. 51.
161. या लेखानुसार लशन उपाध्याय याला दान दिलेले लोणवाटक ते करशडी विषयात अंर्तभूत होते, मिराशी वा.वी., शिलहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख प्रथमावृत्ती, विदर्भ संशोधनमंडळ,नागपूर, 1974, पृ.क्र. 186 भादान दानपत्रातील दानाचा स्विकार करणारा देव लोणादित्य याला हे नाव मिठ उत्पादन करण्याच्या चालू असलेल्या कार्यामुळे पडला असावा.
162. एपिग्राफिया इंडिका, दिल्ली –हे गाव सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील वर्तमान लोणार असावे.

खाणींच्या परिसरातच धातू शुद्धीकरणाचे कारखाने होते. श्रीमंतीचे ऐश्वर्य दाखविण्यासाठी सोने या धातूपासून बनविलेल्या अलंकाराचा वापर केला जात असे. कर्नाटकातील कोलार ही सोन्याची खाण प्राचीन काळापासून प्रसिध्द होती. या परिसरात अशुद्ध सोन्याचे रूपांतर शुद्ध सोन्यात करण्याचे उद्योग चालू होते. कर्नाटकातील हत्ती (Hatti), ही बाजारपेठ सोन्यासाठी अतिशय प्रसिध्द होती. सोने या धातुचा वापर राजकीय व श्रीमंत लोक दैनंदिन वापरातील उपकरणे व अलंकार बनविण्यासाठी करत. अशा उद्योगाचा विकास चालुक्य कालखंडात झालेला होता.

दख्खनचे पठार लोखंड धातुच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. कर्नाटकात लोह खाणी, मोठया प्रमाणात आढळतात. शुद्ध लोखंडापासून विविध प्रकारची अवजारे तयार केली जात. शेतीकामासाठी व घरगुती वापराची अनेक उपकरणे लोखंडापासून तयार केली जात. शुद्ध लोखंडापासून शस्त्राची निर्मिती केली जात. रथ, बैलगाडी तयार करण्यासाठी लोखंड या धातूचा वापर केला जात असे. लोह उत्पादनासाठी बेल्लारी जिल्हा प्रसिद्द होता.

लोखंडाप्रमाणेच ताम्रउद्योग, चालुक्य कालखंडात प्रसिद्ध होता. बेल्लारी, विजापूर व धारवाड या जिल्हयामध्ये तांब्यापासून घरगुती भांडी, शस्त्रे हत्ती व घोडयांना सुशोभित करणाऱ्या वस्तू, दिवे, मूर्ती इत्यादी वस्तू बनविले जात. तांबटकरी व्यवसायिकांची संख्या बऱ्याच प्रमाणात दिसते. हे सर्व उद्योग ग्रामीण भागाशी संबंधित होते.[163]

वरील प्रमुख उद्योग—व्यवसायाशिवाय मासेमारी, मोती निर्मिती व्यवसाय असे व्यवसायही चालू होते. समुद्र किनाऱ्यावरील काही प्रमुख ठिकाणी हा उद्योग चालू होता. मन्नारची खाडी मोती उद्योगासाठी प्रसिद्ध होते. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय मोती निर्मितीचा होता. मारकोपोलस सारख्या अनेक परकीय प्रवांशानी या व्यवसायाचे वर्णन केलेले आहे.[164]

---

163. Nayak H.M., Gopal B.R., South Inidan, Studies, 1st Published, Geetha Books House, Mysore,90, Page No. 306

164. नीलकंठ शास्त्री के.ए., दक्षिण भारत का इतिहास, आवृत्ती 9 वी, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, पटणा 2006, पृ.क्र. 358

## व्यापार

उत्तर चालुक्यकालीन चालुक्य राजा सोमेश्वर द्वितीय याच्या कालखंडातील (इ.स.1130) करडखेल येथील शिलालेखीय संदर्भानुसार येरेयमरस या प्रांतपालाने करडखेल 2000 अंतर्गत असणाऱ्या भाईगावात वसूल केलेले कर सोमेश्वर देवाला देण्याचे नमुद केले.[165] उत्तर चालुक्यकालीन व्यापाराचे प्रामुख्याने दोन भाग पडतात. अ) अंतर्गत व्यापार ब) परदेशी व्यापार या दोन्ही व्यापाऱ्यातून शासनाला मोठया प्रमाणात कर मिळत असे. उत्तर चालुक्याचे राज्य पूर्व–पश्चिम समुद्राच्या मध्यभागी असलेल्या दख्खनच्या पठारावर असल्या कारणामुळे या प्रदेशातून अनेक व्यापारी मार्ग गेलेले होते. व्यापाराच्या वृद्धीसाठी चालुक्य राजे प्रयत्नशील होते. राज्यात अनेक व्यापारी शहरांची वाढ झालेली होती. विविध व्यापारांच्या श्रेणी होत्या. या श्रेणीच्या माध्यमातून व्यापारिक प्रशासन चालत असे. बऱ्याचदा अशा व्यापारी मार्ग, मंदिरे, शहराच्या विकासासाठी बहुमूल्य देणगी दिले जात असे. चालुक्य राजा तेलप द्वितीय यांच्या कारकिर्दितील एका शिलालेखात देशीय व्यापाराचा उल्लेख आहे. हे व्यापारी तट्टूघोडे, कस्तुरी, केसर, रूई, सूत, व्याघ्रचर्म इ. वस्तूवर जकात कर देत असत. या करांचा उपयोग धर्मस्वासाठी (धार्मिक दानधर्म) केला जाई. या कालखंडात व्यापाराचा विकास अधिक प्रमाणात झाला असल्या कारणाने अनेक व्यापारी शहराची निर्मिती झाली. व्यापारी दक्षिण भारतातून उत्तरेतील काशी, वाराणसी, कुरूक्षेत्र, प्रयाग या त्या काळातील प्रसिध्द शहरापर्यंत व्यापाराच्या निमित्ताने जात असल्याचा उल्लेख मिरज शहरातील इ.स. 1144 च्या शिलाहार राजा विजयादित्याच्या शिलालेखात येतो.[166]

### अ) अंतर्गत व्यापार

कल्याणी चालुक्यांचे राज्य दख्खनच्या पठारावर मध्यभागी असल्याने उत्तर दक्षिण व पूर्व पश्चिम जाणारे अनेक प्रमुख व्यापारी मार्ग राज्यातून गेलेले होते. व्यवसायानुसार

---

165. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – VI, Kannada Inscription of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 2001, Page No. 100, 101.
166. Upadhya G.N., Kannada Univesity Epigraphical series – VI, Inscriptions of Maharashtra, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, 2001, Page No.178-179

अनेक श्रेणींची निर्मिती झालेली होती. या श्रेणीत (व्यापारी संघटना) उत्तर भारतातील श्रेणीच्या तुलनेने अधिक संघटीत होत्या. दक्षिण भारतातील 18 शहरे व्यापारासाठी प्रसिद्द होती. त्यापैकी बरीच शहरे चालुक्य राज्यातील होती. या शहरांमधून भारताच्या चेर, चोल, पांड्य, मलय, मगद, कोसल, सौराष्ट, धानुष्ट, कांबोज, लाट, पारस, नेपाळ इत्यादी दूरदूरच्या ठिकाणाशी व्यापार चालत असे. हत्ती–घोडे, बहुमूल्य रत्ने विविध प्रकारचे मसाल्याचे पदार्थ, औषधी, मीठ, साखर, कापड, इत्यादी वस्तूचा मोठया प्रमाणात व्यापार चाले. इसवी सनाच्या बाराशे सालाच्या एका म्हैसूर शिलालेखामध्ये 18 जिल्हयामध्ये व्यापारी ''देश सलात्तु गंडा'' या नावाच्या एका श्रेणीचा उल्लेख आहेत. ही श्रेणी आर्थिक दृष्टिकोनातून चालुक्य राज्यातील अधिक सामर्थ्यवान अशी श्रेणी होती. या काळात अंतर्गत व्यापारासाठी 05, 12 1/2, 15, 20 तसेच 25 टक्के व्याजाने रक्कम मिळत असे. ही रक्कम श्रेणींकडून प्राप्त होई. श्रेणींकडे व्यापारांच्या रक्षणासाठी स्वतःचे सैन्यही असत. श्रेणी, सार्वजनिक ग्रामीण संस्था, सभा तथा उर या व्यापारिक संघटनांना धार्मिक कार्यासाठी संपत्ती जमा करण्याचेही कार्य करावे लागे.[167]

## ब) विदेशी व्यापार

दक्षिण भारतातील अनेक राज्यांचा प्राचीन काळापासून व्यापारी संबंध होते. दहाव्या शतकापासून दक्षिण भारताातील चोलांप्रमाणे चालुक्यांसारख्या इतर राज्यांनाही परदेशांशी व्यापारी संबंध प्रस्थापित करण्यास सुरूवात केली. सुरूवातीला अरबांनी विदेशी व्यापारास प्रारंभ केला. 11 व्या शतकाच्या मध्यात अरब व्यापारांनी पूर्व समुद्र किनाऱ्यावर (बंगालचा उपसागर) व्यापारी वसती उभी करण्यास सुरूवात केली. अरबांच्या भारतातील आगमनामुळे परदेशी व्यापार अधिक गतिमान झाला. पार्शियन आखातीतील सिराफ नावाचे बंदर आशिया खंडात सर्वात प्रसिद्ध व्यापारी बंदर होते. या बंदरात वेगवेगळया देशातील व्यापारी मालाची व वस्तुची देवाण–घेवाण होत असे. या बंदरात सर्वाधिक दक्षिण भारतातील वस्तू आयात केली जात.

दक्षिण भारतातून निर्यात केली जाणारी वस्तूंची विभागणी प्रामुख्याने तीन प्रकारात करता येईल.

---

167. वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत, खंड 1, द्वितीय आवृत्ती, हिंदी माध्यम कार्यान्वय, नितेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, 1985, पृ.क्र. 91.

1) मसाले, औषधी व खाद्य वस्तू

2) उद्योग व्यवसायासाठी लागणारा कच्चा माल

3) उत्पादीत झालेले विविध वस्तू

पहिल्या प्रकारच्या व्यापारी वस्तूमधील दालचिनी व मिरे, दक्षिण भारतातून सर्वाधिक निर्यात केली जाणारी हे एक मसाल्याचे प्रमुख पदार्थ होते. संपूर्ण आशिया व पश्चिमी देश दक्षिण भारतात उत्पादित होणाऱ्या दालचिनी व मिऱ्यांवर अवलंबून होते. श्रीलंकेतून दक्षिण भारतात लवंग आयात केली जाई. व पुन्हा ती भारतीय बंदरामधून परदेशात पाठविले जाई. यामुळे भारतीय व्यापाऱ्यांना अधिक फायदा मिळत असे. निर्याती योग्य आले (आद्रक) दीर्घ काळापर्यंत टिकावे यासाठी त्यावर लाल मातीचा लेप देवून क्विलो, कालिकत, कन्नौर या प्रमुख बंदरामधून परदेशात निर्यात केली जाई. याशिवाय दक्षिण भारतातून कापूर, दालचिनी, त्रिफळा, कस्तुरी, आफू, लाख इत्यादी पदार्थांचे परदेशात निर्यात केले जाई.

निर्यातीतील दुसऱ्या प्रकारातील वस्तूमध्ये औद्योगिक उत्पादनाचा प्रामुख्याने समावेश होता. जसे की रंग, काही विशेष प्रकारची लाकडे, धातू आणि मौल्यवान दगड, रंग निर्मितीसाठी वापरले जाणारे शेंदूर, मेंहदी, नीळ, हरड इत्यादी पदार्थ प्रमुख होते. दक्षिण भारतात उत्पादित होणाऱ्या लाकडामध्ये चंदन आणि सांग यांना परदेशात अधिक मागणी होती.

निर्यात होणाऱ्या तिसऱ्या प्रकारात चर्म वस्तू, रेशमी आणि सूती कपडे, सौंदर्य प्रसाधने इत्यादीचा समावेश होता. या प्रकारातील सर्वाधिक निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूमध्ये सूती प्रकारची रंगविलेली व विविध आकृत्या छापलेले रंगीत कपडे होत्या. पूर्वेकडील चीन व पश्चिमेकडील पार्शियन व परिसरातील देशामधून कापड आणले जाई व ते दक्षिण भारतातून पुन्हा आशिया, आफ्रिका व युरोपातील विविध देशांमध्ये निर्यात केले जाई.

निर्यातीच्या तुलनेत आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंचे प्रमाण फारच कमी होते. आयातीपैकी काही वस्तू इतर देशांमध्ये निर्यात करण्यासाठीच आयात केले जात असे. दक्षिण भारतात आयात होणाऱ्या वस्तूंमध्ये कापूर, रूबार्ब, विविध औषधी पदार्थ इत्यादी प्रमुख पदार्थ होते. यात सर्वाधिक कापूराची आयात केली जाई. औद्योगिक कच्चा मालात

आफ्रिकेतून हस्तीदंत, मक्का येथून मूँगा, पारसियन आखातातून कच्ची मोम यांचे आयात केली जाई. धातूमध्ये चांदी, तांबे व लोखंडाची अल्प प्रमाणात आयात केली जाई. धातूचे आयात प्रामुख्याने मक्केच्या व्यापारांच्या माध्यमातून होत असे. याशिवाय बहरीन, तेगू आणि श्रीलंकेतून मौल्यवान रत्नांची आयात केली जात असे. चीनमधून चीनी आणि पितळची भांडी व रेशमी सूत आयात केले जाई. या कालखंडात दक्षिण भारतात अरबी घोडयांची आयात होत असे.[168]

एकंदरित चालुक्य व दक्षिण भारतातील इतर राजवटीमध्ये व्यापारात मोठी प्रगती झालेली होती. अंतर्गत व्यापारासोबतच परदेशी व्यापारांचाही मोठया प्रमाणात विकास झालेला होता.

## आर्थिक जीवनातील मंदिरांची भूमिका

उत्तर चालुक्य काळात चालुक्य शैलीची विविध मंदिरांची उभारणी करण्यात आली. या मंदिरांचे व्यवस्थापक धार्मिक प्रश्न, सामाजिक व आर्थिक हितसंबंधाचे प्रतिनिधीत्त्व करीत असत. अशी संबंधित बरेच शिलालेख आढळून येतात. वर–वर पाहता शासनकर्त्यांचा मंदिरांना दिल्या जाणाऱ्या देणग्यामागे दिखावू व लोक प्रसिद्धी असा हेतू असला; तरी तो संपत्ती वाटपाचा आणि वाईट प्रसंगी पाठीराखे मिळविण्याचा एक प्रकार होता. या काळात भेटी व दान देण्याची सततची परंपरा चालत आलेली असून भेटीचे स्वरूप सतत बदलत असले; तरी त्यामागे हेतू मात्र समान राहिले. राजघराण्यांनी दिलेल्या देणग्याच्या शिवाय अन्य साधनसामुग्रीतून बांधलेल्या मंदिरांमधूनच व्यामीश्र संस्था विकसित झाल्या. या संस्था फक्त धार्मिक गरजांशी संबंधित नव्हत्या तर त्या वित्तीय, राजकीय व सांस्कृतिक गरजांशी निगडित होत्या. ग्रामीण भागातील मोठया मंदिराच्या कार्यपद्दतीत हे अधिक सहजपणे दिसून येते. अभिजनांच्या मालकीची जमिन विकत घेवून नंतर ती मंदिराला देणगी म्हणून दिले जाते. उत्तर चालुक्य समकालीन, दक्षिण भारतातील राज्यांमध्येही मंदिरे व व्यापारी हे दोघेही सतत जमिनीची खरेदी करत. यावरून या मंदिरांची वित्तीय भूमिका स्पष्ट होते. अनेक प्रकारच्या वस्तू विनिमयासाठीचे मंदिर हे एक स्थळ होते. ज्यात अनेक व्यावसायिकांना मंदिर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नोकरी देत असे.

168. वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत, खंड 1, द्वितीय आवृत्ती, हिंदी माध्यम कार्यान्वय, नितेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, 1985, पृ.क्र. 103

त्यांच्यासाठीही मंदिर हा आकर्षणाचा बिंदू झालेला होता. मंदिर हे जमिनदारांच्या प्राधिकाराचे प्रतिक होते. हे जमिनदार ग्रामीण लोकांच्या जीवनात मध्यस्थी करू शकत असत. एखाद्या विशिष्ट पंथावर लक्ष केंद्रीत करीत. ग्रामीण क्षेत्रात ग्रामसभा भरविण्याची आणि उच्च जातीतील मुलांना औपचारिक शिक्षण देण्याची मंदिर ही जागा होती. वेदांचा खास अभ्यास केलेल्या ब्राह्मणांना अनेकदा ब्रह्मदेय, दाने मिळत असत. दानातून मिळालेली संपत्ती व जमीन ग्रामसभांना दिलेले अंशदान, जे कर दान म्हणून गोळा करण्याची परवानगी मिळालेली असे. त्यातून भक्तांनी देवू केलेले दान आणि ग्रामीण भागात पतपेढीच्या कामातून मिळणारा पैसा अशा विविध प्रकारामुळे मंदिर संस्थांना उत्पन्न मिळत असे. धर्मविधी करणारे धर्मगुरू, लेखी नोंदी सांभाळणारे हिशोब तपासणीस आणि व्यवस्थापनाची काळजी घेणारे प्रशासक या सर्वांना मंदिरांच्या नोकरीत ठेवले जात असे. तसेच इमारतींची डागडुज करणारे आणि त्यांचे रक्षण करणारे इतरही लोक असत. कुशल धनगर मंदिराच्या मालकीच्या जनावरांची काळजी घेत असत. धर्मविधी व मनोरंजन यात गुंतलेले स्वयंसेवक, फुलांचे हार बनविणारे माळी, गायक, नृर्तक व देद्वासी हे निम्न स्तरावरचे लोकही देवळाच्या कार्यात गुंतलेले असत. अनेक लोकांना ईश्वर भक्तीचा एक प्रकार म्हणून काही सेवा मोफत देण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असे. परंतु उदरनिर्वाहासाठी मंदिरांवर अवलंबून असणारेही काही लोक असत. काही मंदिरांना अतिरिक्त सामुग्रीचा व पैशाचा उपयोग करण्याची संधी मिळत असे. अशी मंदिरे व्यापाऱ्यांना व कारागिरांना आकर्षित करीत असत. कारागिरांमध्ये कांस्य, धातूवर काम करणारे, दगड कापणारे आणि कापड बनविणारे असत.[169]

## नगरे व बाजारपेठा

ग्रामीण क्षेत्रात निर्माण होणारी उत्पादने जेथे विक्रीसाठी आणली जात असत, आणि ज्या ठिकाणी वस्तू विनिमयाच्या साहाय्याने व्यापार होत असे अशी ठिकाणे सर्वसामान्यपणे शहरी केंद्राचा मुख्य भाग बनत असत. त्यामध्ये प्रशासकीय केंद्रे जेथे लोक मोठया संख्येने जमत आणि मालाची देवघेव नियमितपणे चालत असे अशी पवित्र स्थाने

169. थापर रोमिला, दी पेग्वीन हिस्टी ऑफ अर्लि इंडिया, प्रथम संस्कृरण, के सागर, पुणे, 2002, पृ.क्र. 452.

किंवा जेथे पुन्हा–पुन्हा उत्सव आणि यात्रा होत असत अशा ठिकाणाचा अंतर्भाव होत असे. ग्रामीण भागात महसूल निर्माण करण्याचे कौशल्य असल्यामुळे महत्व प्राप्त होत गेल्या. प्रमुखांच्या अथवा प्रशासकाच्या नावाने बाजाराची ठिकाणी ओळखली जात. जागोजागी पाहणी करण्याच्या निमित्ताने बहुदा लष्करी तळ उभारले जात असत. विशेषतः एखाद्या ठिकाणची वर्षानुवर्षे पुन्हःपुन्हा पाहणी करावी लागत असे. तेव्हा नगराच्या आधी लष्करी तळ बांधत. ही लष्करी तळ बांधण्याची प्रथा सुरूच राहिली. 10 व्या शतकाच्या अगोदर अस्तित्वात असलेली नगरे या कालखंडात व्यापाराच्या भरभराटीमुळे मोठी झाली. कर्नाटकात आणि तामिळनाडूमध्ये पट्टीणम् असे नामाभिधान असलेली नगरे प्रथम व्यापाराची केंद्रे व अनेकदा सागरी व्यापाराची केंद्रे होती. काही वेळा तेथील मुख्य व्यवसायाचा नगराच्या नावात विशेषत्त्वाने उल्लेख केला जात असे. उदा. वनज पट्टण, व्यापारांचे शहर असा त्या नावाचा अर्थ आहे, पण त्यापूर्वी ही नगरे स्थानिक प्रशासनाचे लक्षवेधी ठिकाण अथवा धार्मिक पवित्रस्थान असण्याची शक्यता आहे. श्रावणबेळगोळ 7 व्या शतकात धार्मिक पवित्र स्थान होते. पण बाराव्या शतकापर्यंत तेथे अनेक आस्थापनांची देखरेख करणाऱ्या व्यापारांच्या वसाहती निर्माण झाल्या. व्यापारी संघटना आणि कुशल व्यापाऱ्यांनी आपल्या व्यापाराची सुरूवात प्रशासकीय केंद्रातून किंवा ग्रामीण वस्तू विनिमयाच्या केंद्रातून केली.

उत्तर चालुक्यांच्या प्रदेशात शहरातील प्रशासनावर व्यापाऱ्यांनी आणि श्रीमंत जमिनदारांनी नियंत्रण ठेवले होते. इतरत्र अनेक ठिकाणी आठवडयाच्या बाजारांची ठिकाणे नगरात विकसित झाली. शहरी प्राधिकरणातील गवुंड आणि हेग्गडे यांचे उच्च अधिकार पदावरील व्यक्तीशी संबंध असत. महाजन हा परिचित असलेला व मोठया प्रमाणावर व भारतीय उपखंडात अनेक भागामध्ये वापरला जाणारा हुद्दा होता. 'महाजन' म्हणजे मोठया अधिकारांची माणसे. कधी कधी हे अभिधान निधर्मी भूमिका बजावणाऱ्या श्रीमंत जमिनदार ब्राम्हणांना लावत असत. मात्र अखेरीस शहरी प्रशासनातील व्यापारात गुंतलेल्या व्यक्तींना ''महाजन'' असे संबोंधले जावू लागले. शहरी प्रशासनातील वरीष्ठ पातळीवर जे काम करीत असत त्यांना घरमालकांकडून वसुल केलेल्या करातील ठराविक प्रतिशत रक्कम बक्षीस म्हणून घेण्याची परवानगी होती. भरभराट आणि उतरती कळा या अवस्थामधून

नगरे गेलेली असली; तरी 10 व्या शतकाच्या सुरूवातीला त्यांची वाढ होण्याचे अनुमान करता येते.[170]

या काळात बाजारांच्या केंद्राना ''नगरम्'' म्हणून ओळखले जात असे. येथे व्यापारी एकत्र जमत. त्या प्रदेशातील उत्पादनाची तेथे देवाण–घेवाण होत असे. ही नगरम् केंद्रे मंदिरांशीही जोडलेले असत. नगरांवर नगर प्रमुख प्रशासकीय कारभार चालवित असे. विशेषतः समुद्रपार व्यापारातून मिळणाऱ्या नफ्यावर कर आकारला जात असे. व्यापारी व श्रेणीपथकर आणि सीमाशुल्क भरत असत.[171]

अशा प्रकारे उत्तर चालुक्य व इतर समकालीन शासन व्यवस्थेतील अर्थकारणाच्या शहरीकरणाचा व बाजारपेठांच्या निर्मितीचा टप्पा महत्त्वूपर्ण ठरतो. व्यापारातून शहरीकरणाला बाजारीकरणाला महत्त्व प्राप्त होवून उत्तर चालुक्यकालीन अर्थव्यवस्थेला भरभराटीस आणण्यात वरील दोन घटक महत्त्वपूर्ण ठरतात. अशा प्रकारे आपण उत्तर चालुक्यकालीन राजकीय, सामाजिक व अर्थिक परिस्थितीची आपण ओळख करुन घेतलेली आहे. पुढील प्रकरणात आपल्या संशोधन समस्येशी संबंधीत तत्कालीन विविध धार्मिक घटकांचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास करु.

---

170. Reddy Devarakonda, Kannada Univesity Epigraphical series – IX, Bagalkot District, First impression, Director, Prasaranga, Kannada University, Hampi, Vidyaranya, Hospet, Bellary District, March 2006, Page No.CVII

171. थापर रोमिला, दि पेग्विन हिस्टी ऑफ अर्ली इंडिया, प्रथमावृत्ती, के.सागर पब्लिकेशन, पुणे, 2002, पृ. क्र. 445.